cmyk

## संपादकीय

### न्यायालयाकडून झणझणीत अंजन

भारतीय घटनेच्या कलम २१ अंतर्गत हमी दिल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि सुरक्षित रस्ते हे अशाच अर्थपूर्ण जीवनाचा आणि सन्मानाने आयुष्य जगण्याचा एक आवश्यक घटक आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७१ | शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### गुजरातमध्ये सर्व मंत्र्यांचे राजीनामे

गांधीनगर : मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वाखालील गुजरात मंत्रिमंडळाचा विस्तार शुक्रवारी होणार आहे. त्यापुर्वी गुरूवारी (दि.१६) सर्व मंत्र्यांनी आपले राजीनामे सादर केले. सध्याच्या मंत्र्यांपैकी जवळपास निम्मे मंत्री बदलले जाऊ शकतात, अशी माहिती भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने दिली. आगामी मंत्रिमंडळ विस्तारात राज्यात सुमारे १० नवीन मंत्री येऊ शकतात. भूपेंद्र पटेल यांनी १२ डिसेंबर २०२२ रोजी दुसऱ्यांदा गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. १८२ सदस्य संख्या असणाऱ्या गुजरात विधानसभेत २७ मंत्री असू शकतात. या महिन्याच्या सुरुवातीला गुजरात सरकारमधील माजी राज्यमंत्री जगदीश विश्वकर्मा यांनी केंद्रीय मंत्री सीआर पाटील यांच्या जागी भाजपच्या राज्य युनिटचे नवे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली.

### कृषी योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड–भरणे

मुंबईः महाडीबीटी पोर्टवरील कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी ३२ लाख ६७ हजार २२५ लाभार्थ्यांची कृषी विभागातर्फे निवड करण्यात आली आहे. कृषी यांत्रिकीकरण योजनेत एवढ्या मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांची निवड होण्याची ही पहिलीच वेळ आहे. तेंव्हा, या सर्व लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. तसेच कृषी यंत्रे/औजारांवरील जीएसटीच्या दरामध्ये ५ टक्के घट करण्यात आलेली असून त्याचा देखिल शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. याबाबतीत कृषी यंत्रे औजारे उत्पादक व विक्रेते यांनी गैरप्रकार केलेला आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशाराही दत्तात्रय भरणे यांनी दिला. विक्रमी ३२ लाख लाभार्थ्यांना लाभ मिळाल्यामुळे अतिवृष्टीतून सावरण्यासाठी या योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

### क्रीडाशिक्षक नसल्यास मान्यता रद्द करणार–कोकाटे

मुंबइः राज्यात यापुढे अल्पसंख्याक शाळांमध्ये क्रीडाशिक्षक असणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, ज्या शाळांमध्ये क्रीडाशिक्षक नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल, असा इशारा क्रीडा व युवक कल्याणमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिला. देशात ६५ टक्के तरुणवर्ग असून, तरुणांना खेळात प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून, क्रीडा संकुल शाळा व महाविद्यालये यांच्याशी जोडण्यात येणार आहेत, असेही मंत्री कोकाटे यांनी सांगितले. मात्र काही शाळांमध्ये क्रीडा शिक्षक नसल्याचे निदर्शनास आले आहे, असे ते म्हणाले.

### आ.निवासातील कॅन्टीनला क्लीनचीट

मुंबई : पावसाळी अधिवेशनादरम्यान आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये शिळे अन्न दिल्याचा आरोप करीत शिंदे गटाचे बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीन कर्मचाऱ्यांना मारहाण केली होती. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) हे कॅन्टीन चालविणाऱ्या अजिंठा केटरर्सचा कॅन्टीनचा परवाना निलंबित केला होता. मात्र अवघ्या महिनाभरातच अन्न व औषध प्रशासनाने ही कारवाई मागे घेत कॅन्टीनला क्लीनचिट दिली आहे. जेवण उत्तमच होते हे स्पष्ट झाल्याने मारहाण करणारे आमदार गायकवाड यांना मोठा झटका बसला आहे. आमदार संजय गायकवाड यांनी शिळे अन्न दिल्याचा आरोप करत आमदार निवासातील अजिंठा केटरर्स या कॅन्टीनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली होती.

### चांदीचे भाव अचानक ८००० रुपयांनी स्वस्त

मुंबईः गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरात जोरदार तेजी पाहायला मिळाली होती. मात्र, आज गुरूवारी चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली. १६ ऑक्टोबरला सायंकाळी ५ वाजताच्या आयबीजेएच्या दरानुसार १ किलोचे चांदीचे दर १६८०८३ रुपये झाल्याचे दिसले. सकाळी चांदीचा दर १७०८५० रुपये किलो होता. तर, १५ ऑक्टोबरला चांदीचा १ किलोचा दर १७६४६७ रुपये होता. म्हणजेच सकाळच्या तुलनेत चांदीच्या दरात ८४०० रुपयांची घसरण झाली. दुसरीकडे आयबीजेएच्या दरानुसार सोन्याच्या दरात गुरूवारी देखील तेजी पाहायला मिळाली आहे. २४ कॅरेट सोन्याचा जीएसटीसह एका तोळ्याचा दर १२७४७१ रुपये आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर १२६९६१ इतका आहे. १८ कॅरेट सोन्याचा एका तोळ्याचा दर ९५६०३ रुपये आहे.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच थेट खात्यात पैसे

## मदत पॅकेजबाबत अर्थमंत्री अजित पवारांची ग्वाही

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळे मागील काही महिन्यांत २९ जिल्ह्यांत सुमारे ६.८ दशलक्ष हेक्टर शेतजमिनीचे नुकसान झाले असून, त्यातील ६० हजार हेक्टर जमीन पूर्णपणे वाहून गेली आहे. या गंभीर परिस्थितीमुळे शेतकरी आणि सामान्य नागरिक संकटात आहेत. याचा विचार करून राज्य सरकारने बुधवारी (दि.७) ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पूरग्रस्त मदत पॅकेज जाहीर केले. याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी गुरूवारी पुण्यातील विधानभवनात कृषी विभागाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले की, या मदतीचे पैसे दिवाळीपूर्वीच थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातील. त्यामुळे मदतीच्या स्वरूपाची आणि रकमेची सविस्तर माहिती खात्यात आल्यानंतरच स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले.**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांना ही मदत दिवाळीपूर्वी वितरित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले गेले आहेत, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. पवार यांनी पुढे सांगितले की, केंद्र सरकारकडून राज्याला सर्वतोपरी मदतीचे आश्वासन मिळाले आहे. मात्र, विरोधक सरकारवर शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोप करत आहेत. या आरोपांवर प्रतिक्रिया देताना पवारांनी विरोधकांना टोला लगावत सांगितले की, विरोधी पक्षांचे ते कामच आहे. राज्य सरकार करत असलेल्या चांगल्या कामाबद्दल ते कधीही चांगले ▶▶ पान २ वर


# पीएम किसान योजनेत होणार बदल

## ३१ लाख शेतकरी बाद होण्याची शक्यता, एका कुटुंबात आता एकालाच मिळणार लाभ

**मुंबई । प्रतिनिधी**

**पीएम किसान योजनेच्या २१ व्या हप्त्याच्या प्रतिक्षेत राज्यातील शेतकरी आहेत. त्यापूर्वी ३१ लाख शेतकऱ्यांवर आसमानीच नाही तर सुलतानी संकट कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. अर्थात केंद्र सरकारने या विषयीची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप दिलेली नाही. याविषयीच्या चर्चा मात्र जोरदार सुरू आहे.**

केंद्र सरकारनुसार, राज्य आणि केंद्र शासीत प्रदेशातील जवळपास ३१.०१ लाख असे लाभार्थी आहेत, जिथे पती आणि पत्नी दोन्ही पीएम



किसान योजनेचा लाभ उचलत आहेत. तर नियमानुसार, एक कुटुंबातील पती अथवा पत्नी यातील एकालाच पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनाचा लाभ घेता येतो. त्यांच्या खात्यात वार्षिक ६ हजार रुपये जमा होतात. याविषयीच्या काही वृत्तानुसार, केंद्रीय कृषी मंत्रालयाने मोठ्या प्रमाणात अर्जांची, ईकेवायसीची पडताळणी सुरू केली आहे. त्यामध्ये एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती पीएम किसान निधी योजनेचा फायदा घेत असल्याचे समोर आले आहे. त्यांची नावे या यादीतून बाद होणार आहेत. ३१.०१ लाख प्रकरणातील १९.०२ लाख लाभार्थ्यांच्या कागदपत्रांचा पडताळा पूर्ण झाला आहे. यामधील १७.८७ लाख ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षण प्रकरणी तेलंगणा सरकारला सुप्रीम कोर्टाचा मोठा धक्का

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसींसाठी ४२ टक्के आरक्षण मिळावे यासाठी तेलंगणा सरकारची याचिका गुरूवारी (दि.१६)सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. या प्रकरणी तेलंगणा उच्च न्यायालयानेही राज्य सरकारच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली होती. या निर्णयाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.**

न्यायाधीश विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने तेलंगणा सरकारची विशेष याचिका फेटाळताना स्पष्ट केले की, उच्च न्यायालयाने गुणवत्तेवर निर्णय घ्यावा. निवडणूक अधिसूचनेपूर्वी आरक्षण विधेयक का



सादर केले गेले नाही, असा सवाल खंडपीठाने राज्य सरकारचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ वकील डॉ. अभिषेक ▶▶ पान २ वर

## तलाठी भरतीत महसूल सेवकांसाठी काही जागा राखीव – बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील महसूल सेवकांचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल सेवकांना तलाठी भरतीत प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले आहे.**

मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीस मुख्य सचिव राजेश मिना, अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ▶▶ पान २ वर

# जालना अनुदान घोटाळ्यातील अरोपी पकडला

**जालना । प्रतिनिधी**


**जिल्ह्यामध्ये घडलेल्या शेती नुकसान अनुदानामध्ये तलाठी, मडळ अधिकारी यांनी संगममताने कोट्याधीचा अपहार केला होते. या प्रकरणात जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने गुन्हे दाखल करण्यात आले होते. यातील काही आरोपींना या पुर्वी आटक करण्यात आली मात्र फरार असलेल्या एका तलाठी आरोपीला एलसीबीने ताब्यात घतले आज न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.**

पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल यांनी सदर गुन्हयातील फरार आरोपींच्या शोधा करीता दिलेल्या आदेशाने आर्थीक गुन्हे शाखेतील अधिकारी यांना गोपनिय माहिती व त्यांनी केलेल्या तांत्रीक विश्लेषनानुसार गुन्हयातील फरार आरोपी कल्याणसिंग अंबरसिंग बमनात हा छत्रपती संभाजीनगर शहरात एका अज्ञात रुममध्ये लपुन बसल्याची माहीती मिळाली त्यानुसार आर्थीक गुन्हे शाखेतील शोध पथक रवाना होवुन छत्रपती संभाजी नगर शहर येथे आरोपी नामे कल्याणसिंग अंबरसिंग बमनात वय ३५ वर्षे व्यवसाय नोकरी तलाठी तहसिल कार्यालय अंबड, रा. निहालसिंगवाडी ता. अंबड जि. जालना हा अटक चुकविण्यासाठी पुष्पा नगर, छत्रपती संभाजी नगर येथे दोन महीन्यापासुन एकाच खोलीत स्वताला बंद करुन मोबाईल किंवा ▶▶ पान २ वर

# बिबट्यांची नसबंदी करणार–उपमुख्यमंत्री

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, शिरूर आणि खेड तालुक्यांमध्ये बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे मानव-वन्यप्राणी संघर्ष तीव्र झाला आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बिबट्यांची नसबंदी आणि त्यांना बंदिस्त करणार असल्याची माहिती



गुरूवारी(दि.१६) माध्यमांशी बोलताना दिली.

केंद्र सरकारला नसबंदीचा प्रस्ताव पाठवला जाणार असून, ४० कोटी रुपयांचा निधी साहित्य खरेदीसाठी ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षणासाठी ना.भुजबळ आणि आ.मुंडे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येणार!

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील करोडो ओबीसी व भटके विमुक्तांना मिळालेले सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील संविधानिक आरक्षण आज खऱ्या अर्थाने धोक्यात आले आहे, या आरक्षणावर अनेक मार्गाने अतिक्रमण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न काही लोकांकडून होत असल्याचे विदारक चित्र सध्या महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. हे चित्र बदलण्यासाठी, ओबीसी समाजाची अस्मिता आणि अस्तित्व टिकविण्यासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज शुक्रवार



दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुलाच्या प्रांगणात होणाऱ्या ओबीसी महाएल्गार सभेसाठी राज्यातून लाखो ओबीसी समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. या ऐतिहासिक सभेचे साक्षीदार होण्यासाठी ओबीसी समाजातील बंधू-भगिनी, युवक, युवती, विद्यार्थी, समता सैनिक आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अॅड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर देशाचे राष्ट्रीय ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ आणि माजी मंत्री आ. धनंजय मुंडे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येत असल्याने या सभेकडे राज्याचे लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्र सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेटियरचा काढलेला जीआर तात्काळ रद्द करावा या सभेतील प्रमुख मागणी असून देशाचे ओबीसी नेते या व्यासपीठावरून सरकारला कोणता इशारा देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. ▶▶ पान २ वर

# कारखानदार दिवसाला १५ लाख काळा पैसा कमावतात

## काटामारीच्या मुद्यावरुन राजू शेट्टींचा हल्लाबोल, मुख्यमंत्र्यांवरही टीका

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

काटामारी थांबविण्यासाठी आम्ही गेल्या १० वर्षापासून आम्ही बोंबलत आहोत. पाच हजाराने चालणारा कारखाना जर १० टक्क्यांनी काटा मारायला लागला तर दररोज ५०० टन काटा मारला जातो. ५०० टनाचे ३ हजार धरले तर दररोज साखर कारखाने १५ लाख काळा पैसा कारखानदारांच्या खिशात जात



असल्याचे शेट्टी म्हणाले. एका कारखान्यात एका दिवशी १५ लाख रुपये काळा पैसा कारखानदारांकडे जात असल्याचेही शेट्टी म्हणाले.

राजू शेट्टी हे जयसिंगपूरमध्ये आयोजित केलेल्या २४ व्या ऊस परिषदेत बोलत होते. ते पुढे म्हणाले, देवेंद्र फडणवीस ज्यावेळी १० वर्षापूर्वी पहिल्यांदा मुख्यमंत्री ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४३.५० क्विंटल | २,३०० | २,७५० | २,५०८ |
| ज्वारी/हायब्रिड : ७७.५० क्विंटल | १,९०० | ३,३०० | २,५१८ |
| मका/लोकल: ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ४,८०० | ५,२०० | ५,००० |
| बाजरी: १०८.०० क्विंटल | २,१०० | २,७७० | २,५२७ |
| मुग: १.५० क्विंटल | ३,५०० | ५,५०० | ४,५०० |
| सोयाबीन: १०८२.०० क्विंटल | ३,४०० | ४,२२० | ३,९५५ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,३०० | ४,३०० | ४,३०० |

# ऐन दिवाळीत एसटी आरक्षण प्रणाली ठप्प!

**मुंबई । प्रतिनिधी**

**ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटीने गावी जाणा–या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे. एसटी आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याने प्रवास कसा करायचा असा प्रश्न आता प्रवाशांसमोर पडला आहे.एसटी आरक्षण प्रणाली सॉफ्टवेअर आणि कंपनीमध्ये दोन वर्षाआधी महामंडळाने बदल केला आहे. त्या माध्यमातून जुन्या आरक्षण प्रणालीच्या जागी नवीन आरक्षण प्रणाली आणली. पण सदर प्रणाली ही**



**सोयीस्कर होण्याऐवजी जास्तच किचकट होत असल्याचं चित्र आहे.**

ऐन दिवाळीच्या मोक्यावरती आरक्षण प्रणाली पूर्ण बंद पडली असून प्रवाशांना नाहक त्रास होत आहे. तर आरक्षण प्रणाली ठप्प झाल्याचा फटका प्रवाशांसह एसटी महामंडळालाही बसत असल्याचं चित्र आहे. तसेच नवीन प्रणालीमुळे कर्मचारीही वैतागले आहेत. कर्मचा–यांना मेमो देणे, मशीन इश्यु करणे या साठी आधी एका गाडीसाठी आरक्षण मेमो प्रिंट काढतांना एक कागद लागत होता. आता एकाच मेमोची प्रिंट घेण्यासाठी तीन कागद लागतात. त्यामुळे महामंडळाचा खर्चही वाढल्याचं दिसून येत आहे. आधीची आरक्षण प्रणाली ही खूप छान आणि सोयीस्कर होती. ▶▶ पान २ वर

# बिहार निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपच्या स्टार प्रचारकात फडणवीस, तावडे



**दिल्ली। वृतसंस्थत्त**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी वातावरण आता तापत आहे. राजकीय पक्ष त्यांचे स्टार प्रचारक जाहीर करण्यात व्यस्त आहेत. यातच आता भारतीय जनता पक्षानेत्यांच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये अनेक राजकीय नेत्यांचे नाव आहे. तर महाराष्ट्रातील बड्या नेत्यांची नावे या यादीमध्ये आहेत. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# न्यायालयाकडून झणझणीत अंजन

भारतीय घटनेच्या कलम २१ अंतर्गत हमी दिल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि सुरक्षित रस्ते हे अशाच अर्थपूर्ण जीवनाचा आणि सन्मानाने आयुष्य जगण्याचा एक आवश्यक घटक आहे, असे महत्त्वपूर्ण निवेदन मुंबई उच्च न्यायालयाने एका खटल्याच्या दरम्यान केले आहे. म्हणजेच रस्त्याच्या विकासाकडे गंभीरपणे लक्ष न देता रस्तेबांधणी करणारे जेव्हा काही कालावधीनंतर त्यावर निर्माण झालेल्या खड्ड्यांची आणि खराब रस्त्यांची जबाबदारी घेत नाहीत तेव्हा त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन केले आहे असेच म्हणावे लागते, हेच उच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये सूचित केले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे मृत्यू आणि दुखापतींसाठी जबाबदार असलेल्यांना वैयक्तिकरित्या कधी जबाबदार धरले जात नाही आणि त्यांच्या स्वतःच्या खिशातून आर्थिक जबाबदारी किंवा नुकसानभरपाई उचलण्यास त्यांना भाग पाडले जात नाही तोपर्यंत अशा व्यक्तींना या घटनांचे गांभीर्य समजणार नाही, असेही न्यायालयाने या खटल्यात म्हटले आहे, जे अत्यंत महत्वपुर्ण आहे.

महाराष्ट्राची राजधानी मुंबई असो किंवा महाराष्ट्रातील इतर महानगरे असोत किंवा देशाच्या कानाकोपऱ्यातील महानगरे आणि नगरे असोत, त्या ठिकाणी नेहमीच खराब रस्ते आणि खड्डे यांची चर्चा होत असते. पण आता मुंबई उच्च न्यायालयाने एका निकालाच्या दरम्यान खराब रस्त्यांवर आणि खड्ड्यांच्या संस्कृतीवर जे ताशेरे ओढले आहेत ते पाहता या रस्त्यांच्या विकासासाठी जबाबदार असलेली प्रशासन यंत्रणा डोळे उघडून जागी होईल अशी आशा करायला हरकत नाही. गेल्या काही वर्षांपासून रस्ते बांधकाम करणारे व्यावसायिक किंवा पूल बांधणारे व्यावसायिक यांच्यावर काही प्रमाणात जबाबदारी टाकण्यात आली असली, तरी ऐन पावसाळ्याच्या कालावधीमध्ये रस्त्यांची जी दुर्दशा समोर आली आहे त्याची जबाबदारी निश्चित कोणावर टाकायची हाही प्रश्न आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि गोव्याची राजधानी पणजी यांना जोडणारा मुंबई-गोवा महामार्ग हा तर नेहमीच चर्चेत असणारा विषय आहे. या रस्त्याची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत आणि या महत्त्वाच्या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य आहे. अशाच प्रकारची परिस्थिती काही प्रमाणात मुंबई-बेंगलोर महामार्ग असो किंवा इतर छोटे महामार्ग असोत, त्यावरही आहे. समृद्धी महामार्ग हा मोठा गाजावाजा करून निर्माण करण्यात आलेला विकास प्रकल्प आहे. पण नुकतेच या समृद्धी महामार्गावरील रस्त्याला गेलेले तडे आणि पडलेले खड्डे माध्यमांनी समोर आणले होते.

वाहतुकीची व्यवस्था चांगल्या प्रकारे उपलब्ध व्हावी आणि वाहतूक करणाऱ्यांचा वेळ वाचावा या दृष्टिकोनातून महामार्ग बांधले जातात. सरकारच्या तिजोरीत जेव्हा पैसे नसतात तेव्हा बीओटी तत्त्वावर हे प्रकल्प राबवले जातात आणि नंतर सर्वसामान्यांच्या माथी टोल मारला जातो. रस्ते व्यवस्थित असतील तर टोल देण्यासही सर्वसामान्य नागरिकांचा आक्षेप नसतो. पण भरमसाठ टोल आकारूनही जेव्हा रस्ते व्यवस्थित उपलब्ध नसतात तेव्हा मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या नशिबी फक्त मनस्ताप येतो. अशा प्रकारच्या खराब रस्त्यांमुळे केवळ वाहतुकीमध्ये गैरसोय होते असे नाही तर छोटे मोठे अपघात होऊन अनेक वेळा गंभीर दुखापती होतात आणि मृत्यूलाही सामोरे जावे लागते. असाच एक खटला उच्च न्यायालयाच्या समोर आल्यामुळे त्यांना या विषयाची गंभीर दखल घ्यावी लागली. या प्रकरणात संबंधित दुखापतग्रस्त व्यक्तीला आणि त्यांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले असले, तरी या खटल्याच्या निमित्ताने उच्च न्यायालयाने जे विविध विचार व्यक्त केले आहेत त्याची गंभीर दखल आता सरकारला आणि बांधकाम व्यावसायिकांना घ्यावीच लागेल. सर्वसामान्य नागरिकांना वापरण्यासाठी उपयुक्त ठरतील आणि त्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही अशा प्रकारचे रस्ते महामार्ग पूल आणि इतर वाहतूक सोयी उपलब्ध करणे ही एक घटनात्मक जबाबदारी आहे असेच उच्च न्यायालयाने या निकालामध्ये स्पष्ट केले आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. एकीकडे सरकारतर्फे अब्जावधी रुपये खर्च करून विमानतळ, बंदरे आणि रेल्वे मार्ग आणि मेट्रो सारखे प्रकल्प उभारले जात असताना सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीचे रस्ते मात्र अद्यापही गैरसोयीनेच ग्रस्त आहेत हा विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे. विमानतळ, मेट्रो प्रकल्प आणि मोठ मोठी बंदरे ही जर दिखाऊ विकासाची प्रतीके असतील तर रस्ते हे त्या विकासातील खड्डे आहेत हे वास्तवही या निमित्ताने मान्य करावे लागते. एखादा प्रकल्प मंजूर केल्यापासून तो पूर्ण होईपर्यंत योग्य प्रकारचे ऑडिट केले जात नसल्याने आणि या अशा प्रकल्पाचे व्यवस्थापनही चुकीच्या पद्धतीने केले जात असल्याने आणि नियंत्रण करणाऱ्या यंत्रणाही दुर्लक्ष करण्याच्या भूमिकेत असल्याने रस्ता ही महत्त्वाची सोय आता गैरसोयीची वाटू लागली आहे.

## पान ६ वरून...

### न.प.निवडणूकीत तरुणांना

असरार, पिंटू माने, खमर, द्वारकादास फटाले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगरपरिषद निवडणूक ही आपल्यासाठी नवी नाही. परिस्थिती काहीही असो, शहरातील जनता आपल्या सोबत उभी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बीड नगरपरिषद निवडणुकीत मी माझ्या विधानसभा निवडणुकीपेक्षा अधिक ताकद लावणार आहे. कायम निष्ठेने सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनाच पक्षाकडून संधी दिली जाणार आहे. परंतु आपण उभे केलेले काही लोक आज पक्षातील नेत्यांकडेच आपली तक्रार करत आहेत, ही खेदजनक बाब आहे. प्रत्येकाने आपापले घर मजबूत करावे, इतरांकडे पाहू नये. ज्यांना आजपर्यंत स्वतःची नगरपरिषद ताब्यात घेता आली नाही, ते बीडमध्ये येऊन काय करणार? असा टोला त्यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची सांगड घालून आपण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. अजितदादांनी बीड शहरासाठी सर्वाधिक निधी दिला आहे. सीट्रिपलआयटी, शासकीय इमारती, नदी सुशोभीकरण, डीपी रस्ते यांसारखे महत्वाचे विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. अनेक प्रस्तावांवर बसून चर्चा करून निधी मिळवला, परंतु त्याचे श्रेय आमदार घेत आहेत. आमदारांचा फंड नेमका कुठे गेला याबाबत मात्र कोणी बोलत नाही. माजी आमदारांच्या कामांचे बोर्ड दिसतात; मात्र निधी कोणत्या कामावर खर्च झाला याचा हिशोब कोणी देत नाही, असेही त्यांनी नमूद केले. बीडच्या विकासासाठी नगरपरिषद निवडणूक आपल्या ताब्यात येणे आवश्यक आहे. गेल्या तीन ते साडेतीन दशकांत मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. मात्र लोकसंख्या व क्षेत्रफळ वाढल्याने शहराच्या हद्दीबाहेरील भागात विकासकामे अद्याप अपूर्ण आहेत, असेही ते म्हणाले. या बैठकीत अनेकांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा झाली. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

-------------

### राष्ट्रवादीच्या बैठकीत

पक्ष पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा मा.आ.संगिता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, पं.स.केज माजी सभापती अशोक तात्या तारळकर, खरेदी विक्री संघ केजचे अध्यक्ष बालासाहेब दादा बोराडे, मा.जि.प.सदस्य युवराज गोरे, माजी अध्यक्ष विलास जोगदंड, पंचायत समिती केजचे माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, महिला तालुकाध्यक्ष तसलीम इनामदार, केज शहराध्यक्ष शब्दो खतीब माजी पं.स.सदस्य बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, प्रेमचंद कोकाटे, न.पं.केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, माजी नगरसेवक कपिल मस्के, शरीफ सय्यद, शितल लांडगे, विमल जोगदंड, व पंचक्रोशितील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत पक्ष संघटन बळकटीकरण, मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका पोहोचविणे आणि आगामी निवडणुकीसाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने, शिस्तबद्ध पद्धतीने काम करण्यावर भर देण्यात आला.

-------------

### ओबीसी महाएल्गार

लक्ष्मणराव गायकवाड, प्राध्यापक मनोहर धोंडे, राजाराम पाटील, नवनाथ आबा वाघमारे, सुप्रसिद्ध विधीज्ञ मंगेश ससाने, सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुदे यांच्यासह विविध छोट्या-मोठ्या असंख्य ओबीसी समाजातील नेते कार्यकर्ते आणि सामान्य ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. ओबीसी समाजाला भारतीय संविधानानुसार आरक्षणाचे हक्क मिळाले आहेत; परंतु त्यामध्ये असंवैधानिक पद्धतीने खुसखोरी करून या अत्यंत छोट्या छोट्या समाजावर अन्याय होणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे भविष्यात हा प्रचंड मोठा धोका असून हा धोका वाचवण्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या सर्वसामान्य गरिबांसाठी न्याय मिळावा म्हणून ज्येष्ठ नेते मंत्री छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात हा देशातील ओबीसी समाज एकवटला आहे. १७ऑक्टोबर २०२५ रोजी बीड येथील छत्रपती संभाजी राजे क्रीडा संकुल मधील मैदानावर होणाऱ्या या सभेची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. शुक्रवारच्या दुपारी होणाऱ्या या सभेसाठी बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच मराठवाड्यातील संपूर्ण ओबीसी बांधव येण्याची तयारी झाली आहे. दरम्यान, अखिल भारतीय समता परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस एडवोकेट सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील सर्व ओबीसी समाज घटक उस्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते माऊली शिरसाठ, मोहनराव आघाव, केशव तांदळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

-------------

### घाटनांदूर ग्रामपंचायतचा

मिशन पाईपलाईनचे काम करीत असताना ग्रामपंचायत मालकीचा शासकिय निधीतून केलेला रस्ता खोदून अंदाजे २ कोटी रूपयांचे नुकसान करणाऱ्या संबंधित गुत्तेदार, सरपंच तसेच शासकीय यंत्रणेचा भाग असलेले ग्रामसेवक, शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करून त्यांचे निलंबन करावे, रस्त्याचे नुकसान केलेली रक्कम संबंधितांकडून वसूल करावी, तसेच जलजीवन मिशन पाईपलाईनचे काम करणारी एजंसी ब्लॅक लिस्ट करावी अशी मागणी केली आहे. या प्रमुख मागणीसाठी रिपब्लिकन बहुजन सेना युवा जिल्हाध्यक्ष दयानंद लांडगे हे मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत आहेत. त्यांच्या उपोषणाला दिवसेंदिवस जनसमर्थन मिळत आहे. निवेदनाची प्रतिलिपी पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन अंबाजोगाई शहर यांना देण्यात आली आहे.

-------------

### उपशिक्षणाधिकारी मारुती

आली. मारोती जाधव यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात डीएड कॉलेज आणि योजना शिक्षणाधिकारी कार्यालयात सहाय्यक योजना शिक्षणाधिकारी म्हणून काम केले आहे. गेल्या अनेक वर्षापासून चारही उपशिक्षणाधिकारी पदे रिक्त होती. माध्यमिक शिक्षण विभागात गेल्या १३ जून महिन्यापूर्वी विपुल भागवत यांची नियुक्ती झाली होती. गुरुवारी जाधव यांनी पदभार स्वीकारला. तर शुक्रवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी श्रीमती सय्यदा अंजुमन जहागीर या प्राथमिक शिक्षण विभागात रुजू होणार असल्याचे समजते. अद्यापही शिक्षण विभागात एका उप शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे.

-------------

### पुणे येथील श्री वर्धमान

आष्टी तालुक्यात आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली सांगवी आष्टी, धामणगाव, खडकत, घाटापिंपरी या गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन शेकडो कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात अमित गुंदेचा, अनिल कांकरिया,सचिन गुंदेचा, निलेश रुणवाल, हर्षद लुनिया, परेश कटारिया, डॉ. योगेश कांकरिया, सागर रुणवाल आदी जैन श्रावळ संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मदतीबद्दल मराठवाडाभूषण लोकनेते आ.सुरेश आण्णा धस प्रतिष्ठान व गावकऱ्यांच्यावतीने जैन श्रावळ संघाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत त्यांचा सन्मान करण्यात आला.

-------------

### विनायक रत्नपारखी

प्रार्थना केली की मराठवाड्यामध्ये अति प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे पूरपरस्थिती निर्माण झाली व त्या परिस्थितीतून सावरण्याची शक्ती दे व सर्वांचे आरोग्य उत्तम लाभावे अशी प्रार्थना केली. तसेच विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्वर्गीय हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चारिटेबल ट्रस्ट अमरावती व श्रीराम संस्थान नांदगाव पेठच्या सौजन्याने अमरावती येथील भाजपा उपाध्यक्ष विवेक गुहलानी यांच्या वतीने मंजरथ येथील १०० गरजू गरीब शेतकरी शेतमजूर पूरग्रस्त व्यक्तींना किराणा किटचे वाटप केले . मंजरथ येथील ३० गरजू व अपंग व्यक्तींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.नुकतीच पर्जन्यवृष्टी जास्त प्रमाणात झाल्यामुळे दूषित दूषित पाण्यापासून कुठले आजार होऊ नये म्हणून ५०० मेडिक्लोर ड्रॉपचे वाटप करण्यात आले.माजलगाव शहराजवळ असलेल्या देवखेडा गोशाळेला आर्थिक देणगी दिली. सायंकाळी ७:०० वाजता श्री गणेशाची पूजा व शांतीपाठ करून माजलगाव शहरातील सर्व जनता सुखी समाधानी राहावी म्हणून ५१ ब्रह्मवृंदांच्या हस्ते पूजा अर्चना केली . वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता व केक कट न करता साध्या पद्धतीने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.रत्नपारखी यांना वाढदिवसानिमित्त लोकनेत्या नामदार पंकजा मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख आयुष्यमान भारतचे राज्यप्रमुख ओमप्रकाश शेटे, राष्ट्रवादीचे रमेश आडसकर,भाजपा ज्येष्ठ नेते डॉ प्रकाश आनंदगावकर, ज्ञानेश्वर मेंडके, अनिल मुळे,अँड विश्वजित देशपांडे, संजय मालानी यांनी दूरध्वनीच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तर वाढदिवसा निमित्त झालेल्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमास प्रत्यक्ष विविध कार्यक्रमाला उपस्थित राहनारे राज्य परिषद सदस्य अरुण राऊत,प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील, राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी,जगदीश साखरे,पत्रकार उमेश मोगरेकर, दिपक मेंडके, तुकाराम येवले, कमलेश जाबरस, आनंत शास्त्री जोशी,माजी नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके,डॉ अभिजीत सोळुंके, रूपाली कचरे,पूजा मुंडकर,संपादक शिवाजी रांजवण माजी तालुकाध्यक्ष हनुमान कदम,माजी नगराध्यक्ष शेख मंजूर,आकाश गुलानी,प्रशांत भानप,अभय होके अविनाश कांडूरे, संतोष वाघमारे, मदन पांढरे,डॉ उद्धव नाईकनवरे, राहुल लंगडे,ईश्वर खुरपे,पवन मोगरेकर,दत्ता काळे,भालचंद्र पाठक,बी.एन. कुलकर्णी,दत्ता महाजन,राज कदम राहुल देशमुख अनंत कुलकर्णी सतीश जोशी,राम शिंदे,प्रल्हाद दळवी कैलास खुरपे,बाळासाहेब क्षिरसागर,डॉ सचीन देशमुख,डॉ स्वानंद कुलकर्णी, डॉ किशोर रत्नपारखी,रविंद्र कानडे,नामदेव मुळे,निरंजन वाघमारे,प्रशांत भानप,निखिल वाघमारे,संतोष जाधव,रामेश्वर चव्हाण,गौरी देशमुख,छाया कुलकर्णी,चित्रा पाठक,भारती घुबडे,अनिता अलकुंटे,मुकुंद जोशी,पत्रकार संजय मालानी, उमेश जेथलिया, प्रदीप कुलकर्णी, कैलास जोशी, ऋषिकेश पाठक, हरिभाऊ नवले, सुभाष कांबळे, रमाकांत जवळेकर, मंगेश उपाध्य,सुधीर जोशी,मनोज बिंदू , कार्यक्रमास उपस्थित होते.

-------------

### कै.वसंतराव नाईक

आदित्य दिलीप जाधव व अमन रमजान शेख या दोन विद्यार्थ्यांनी अंबाजोगाई तालुक्याचे प्रतिनिधित्व करून यश मिळविले आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशामागे क्रीडाशिक्षक प्रविण उत्तमराव ठोंबरे, गणेश राठोड आणि श्रीमती ए.डी.शिंदे यांचे शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तसेच संस्थेचे सचिव अनिल राठोड यांनी विविध स्पर्धांमध्ये यशस्वी, सहभागी विद्यार्थी, पालक आणि मार्गदर्शक शिक्षकांना शुभेच्छा देत, पुढील स्पर्धांसाठी प्रोत्साहन दिले. मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

**विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या एकजुटीचे फळ :**

कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतली ही उत्कृष्ट कामगिरी प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातील या मुला-मुलींनी क्रीडाक्षेत्रात दाखविलेला चमकदार डौल कौतुकास्पद आहे. हे यश विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या एकजुटीचे फळ आहे. या सर्व यशस्वी खेळाडूंना मनापासून अभिनंदन आणि पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा.

**डि.बी.क्षीरसागर**

(सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड.)

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना आणि शारीरिक सक्षमता वाढते :

ग्रामीण भागातील असूनही क्रीडा क्षेत्रात असे वैभव संपादन करणे हे विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण सराव, लयीने प्रयत्न आणि शिक्षकांच्या समर्पित मेहनतीचेच फळ आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना आणि शारीरिक सक्षमता वाढते. पुढील जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी या सर्व खेळाडूंकडून आणखी चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. सर्व यशस्वी खेळाडूंना हार्दिक अभिनंदन.

---------------

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच थेट

बोलणार नाहीत. ते म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी आकडेवारीतले हे सर्वात मोठे पॅकेज आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्यानंतर मदतीचा प्रत्यक्ष फायदा दिसून येणार आहे. तसेच, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत झालेल्या चर्चा नंतर केंद्राकडून राज्याला पूर्ण सहकार्य मिळणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल लवकरच पूर्ण करून केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. या अहवालात नुकसानग्रस्त पिकांच्या, जनावरांच्या, जीवितहानीच्या तसेच रस्ते, पूल आणि विहिरींच्या नुकसानीची सविस्तर माहिती असेल. अहवाल तयार झाल्यानंतर केंद्राचे पथक राज्यातील पाहणी करतील आणि त्याचा अहवाल सादर करतील. त्यानंतर केंद्र सरकारकडून राज्याला मदत मिळणार आहे, असे पवारांनी सांगितले.

-----------

### ओबीसी आरक्षण प्रकरणी तेलंगणा

मनु सिंघवी यांना विचारला. यावर सिंघवी यांनी सांगितले की, तामिळनाडूच्या राज्यपालांच्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर हे विधेयक मानलेल्या संमतीच्या आधारे कायदा बनले. या कायद्याला कोणतेही आव्हान न देता स्थगिती मिळाली. यापूर्वी, तेलंगणा उच्च न्यायालयाने राज्य सरकारला निर्देश दिले होते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या तिहेरी चाचणी चौकटीत घ्याव्यात. राज्य सरकारने तेलंगणामध्ये ओबीसी आरक्षण ४२ टक्क्यांपर्यंत वाढवले, ज्यामुळे एससी (१५ टक्के) आणि एसटी (१० टक्के) आरक्षणांसह एकूण आरक्षण ६७ टक्क्यांपर्यंत पोहोचले, जे तिहेरी चाचणी नियमाचे उल्लंघन करते. उच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर रोजी ४२ टक्के ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश देणाऱ्या राज्य सरकारच्या आदेशावर अंतरिम स्थगिती दिली होती.

------------

### पीएम किसान योजनेत

म्हणजे ९३.९८ टक्के अशी प्रकरणं समोर आली आहेत, ज्यात पती आणि पत्नी हे दोघेही या योजनेचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. केंद्रिय कृषी मंत्रालयाने सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशाला याविषयीचे पत्र दिले होते. त्यात सर्व लाभार्थ्यांच्या पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. पती, पत्नी अथवा कुटुंबातील इतर सदस्यांना जर या योजनेचा लाभ मिळत असेल, तर एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला ६००० रुपयांचा फायदा देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

------------

### बिबट्यांची नसबंदी

मंजूर करण्यात आला आहे. तसेच, गुजरातमधील वनतारा प्रकल्पात ५० बिबटे पाठवण्याचा आणि १२५ बिबटे पकडणार असल्याचे त्यांनी सांगितले. अजित पवार यांनी सांगितले की, बिबट्यांची वाढती संख्या रोखण्यासाठी केंद्र सरकारला नसबंदीचा प्रस्ताव पाठवला जाईल. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री भूपेंद्र यादव यांच्याशी फोन केला आहे. यादव यांनी बिबट्यांची नसबंदी करण्याचा प्रस्ताव पाठवण्याची सूचना केली आहे. तसेच, गुजरातमधील वनतारा प्रकल्पात सुमारे ५० बिबटे पाठवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले, जुन्नर तालुक्यातील ऊसशेतीमुळे बिबट्यांना अनुकूल वातावरण तयार झाले आहे. यामुळे या भागातील बिबट्यांची संख्या २०० वरून ८०० पर्यंत वाढली आहे. यामुळे मानव-बिबट्या संघर्ष गंभीर बनला आहे. या समस्येवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने वन विभागासोबत तातडीने बैठक घेतली. या बैठकीत बिबट्यांना पिंजऱ्यात बंदिस्त करणे आणि त्यांची नसबंदी करणे यासारख्या उपाययोजनांवर चर्चा झाली. यासाठी जिल्हा नियोजन समितीने बिबट्यांना बंदिस्त करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

---------

### जालना अनुदान घोटाळ्यातील

इतर कोणत्याही सोशल मिडीयाचा वापर न करता राहत असलेल्या आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने सखोल तपास सुरु आहे. सदर गुन्हयातील इतर फरार आरोपीतांचा शोध सुरु आहे. सदरची कामगीरी ही मा. श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

-------------

### तलाठी भरतीत महसूल सेवकांसाठी काही जागा

ओमप्रकाश गुप्ता, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, तसेच महसूल सेवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणीमध्ये समाविष्ट करून मानधनाऐवजी वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी विचारात घेण्यात आली. मात्र, सध्याच्या नियमांनुसार वेतनश्रेणी लागू करता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. महसूलमंत्र्यांनी महसूल सेवकांना न्याय देण्यासाठी पर्याय सूचवला. त्यांच्या अनुभवानुसार तलाठी भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवून, ज्यांना किमान पाच वर्षांचा अनुभव आहे, त्यांना २५ अतिरिक्त गुण देण्याचा प्रस्ताव मांडला. अधिकाऱ्यांनी या प्रस्तावावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच शासन निर्णय निघण्याची शक्यता आहे. बैठकीत महसूलमंत्र्यांनी महसूल सेवकांच्या इतर मागण्यांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

-----------

### कारखानदार दिवसाला १५

झाले होते, त्यावेळी मी साखर कारखाने काटा कसे मारतात याचे पुरावे दिले होते. कारखाने कसे विकतात? याचे पुरावे दिले होते. पण त्यांनी सगळे पुरावे किरीट सोमय्यांना दिले. त्यानंतर त्यांनी सर्व साखर कारखानदारांनाच भाजपमध्ये घेतल्याचे शेट्टी म्हणाले. सगळे पुरावे आपल्याच खिशात ठेवले. आता मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी कारखाने पैसे देत नाहीत म्हणाले त्यावेळी फडणवीस म्हणतात की, ते पुरावे आता बाहेर काढू. असे म्हणत शेट्टींनी फडणवीसांवर टीका केली. म्हणजे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री काय ब्लॅकमेलर आहे काय? असेही शेट्टी म्हणाले. शेट्टी म्हणाले, काटा मारीतून एका वर्षाला नवीन एक साखर कारखाना तयार होऊ शकतो, इतक्या मोठ्या प्रमाणात काटामारी केली जाते. पेट्रोल पंपावर काटा मारला तर लगेच सॉफ्टवेअरने कळते, तशीच यंत्रणा तयार केली तर काटामारी सहज रोखता येईल असे शेट्टी म्हणाले. देवाभाऊ तुमचा हात कुणी धरला आहे? असा सवाल शेट्टींनी केला. कोल्हापूरमध्ये गेल्या अनेक वर्षे काटामारी रोखणारी यंत्रणा धूळखात पडली आहे. स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांना सांगतो ती यंत्रणा भंगारात काढून टाका. उसाला यावेळी तुरे येणार आहेत. ऊस तोडायला पैसे देऊ नका, २० जानेवारीच्या आत हंगाम संपणार आहे. त्यामुळे ऊस घालवायला गडबड करू नका, घरात शोधत येणार आहेत तुमचा ऊस तोडायचा का म्हणून. आम्ही ऊस तोड मजुरांच्या पैसे वाढीला विरोध केला आहे का? उलट आम्ही पाठींबा दिला आहे. तर मग ऊस तोडणाऱ्यांना पैसे द्यायची काय गरज आहे, असे शेट्टी यावेळी म्हणाले.

-----------

### ओबीसी आरक्षणासाठी ना.भुजबळ आणि

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार सभेचे आयोजन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या सभेला जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, प्रा. लक्ष्मण हाके, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहर धोंडे, सयाजी झुंजार, राजाराम पाटील, नवनाथ वाघमारे, अ‍ॅड. मंगेश ससाने, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे, ईश्वर बाळबुधे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी समाजाच्या येणाऱ्या अनेक पिढ्यांच्या भवितव्यासाठी हे आरक्षण टिकवणे गरजेचे आहे. संविधानाने ओबीसींना दिलेलं आरक्षणाचे सुरक्षा कवच कोणी झुंडशाहीच्या जोरावर हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यांचा प्रत्येक डाव हाणून पाडला जाईल, याच भूमिकेतून बीड येथे ओबीसींची महाएल्गार सभा आयोजित करण्यात आलेली आहे. ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण वाचविणे हि सर्व जाती बांधवांची जबाबदारी आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार सभा होणार असून या सभेला ओबीसी समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

----------

### बिहार निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपच्या स्टार

या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, शिवराज सिंह चौहान, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ अशा मोठ्या नेत्यांची नावे आहेत. तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेते विनोद तावडे यांचेही नाव या यादीत आहे. भाजपने आता सर्व १०१ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. पक्षाच्या तिसऱ्या यादीत १८ उमेदवारांचा समावेश होता. बिहारमधील निवडणुका दोन टप्प्यात होणार आहेत. पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबर रोजी तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. निवडणुकीचा निकाल १४ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे.

------------

### ऐन दिवाळीत एसटी आरक्षण

पण आता जी आरक्षण प्रणाली आहे ती अतिशय अवघड आणि खूप किचकट करण्यात आली आहे. त्यामुळे एसटी कर्मचा-यांना सुद्धा या आरक्षण प्रणाली वर काम करताना खूप त्रास होत आहे. राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिवाळीच्या आधी 'आवडेल तिथे प्रवास' योजनेच्या पासमध्ये कपात करून प्रवाशांना खुशखबर दिली आहे. एकूण २० ते २५ टक्के कपात केल्याचे अधिका-यांनी सांगितले.'आवडेल तिथे प्रवास' या योजनेअंतर्गत प्रवाशांना एकाच पासवर राज्यातील कुठेही अमर्याद प्रवास करण्याची सुविधा मिळते.

## उपमुख्यमंत्री पूरग्रस्तांच्या मदतीला धावून आले पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप

**मंठा । प्रतिनिधी**

**यावर्षीच्या अतिवृष्टीमुळे परतुर तालुक्यातील नदीकाठच्या अनेक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने पूरग्रस्त गोळेगाव येथील नागरिकांना शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या हस्ते जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. यावेळी सुदर्शन सोळंके, अमोल सुरुंग, रामजी खवल, सुरज कुलथे, रणजीत कोल्हे यांची उपस्थिती होती.**



परतुर तालुक्यातील गोळेगाव, गंगासावंगी, चांगतपुरी, संकनपुरी यासह काही गावांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. या पावसाने खरीप पिकांनाच नव्हे तर शेतकऱ्यांच्या स्वप्नांनाही वाहून नेले. खरीप पिके वाहून गेली, जमीन खरडून गेली तसेच संसार उपयोगी साहित्य व धान्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. यापूर्वी जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली आणि शेतकऱ्यांची अस्थिवाइकपणे विचारपूस सुद्धा केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त असलेल्या गोळेगाव येथील शेतकऱ्यांना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या हस्ते जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये चटई, सतरंजी, बेडशीट, ब्लँकेट, साडी, कपडे मेणबत्ती व किराणा साहित्याचा समावेश होता. यावेळी सुभाष धुमाळ, राजेभाऊ कादे, मारुती धुमाळ, उस्मान शेख, प्रदीप ठोके, माऊली शेळके, अशोक धुमाळ, बाळू अंभोरे, तुकाराम राजबिंडे, नितीन राठोड, सत्यवान धुमाळ, भगवान वाघमारे, हरिभाऊ टेकाळे, प्रभू येवले, नागोराव मुंडे, कैलास ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५ ३

## थोडक्यात...

### ओबीसी समाजाच्या मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा -प्रा.वैजेनाथ शिंदे

वडवणी । प्रतिनिधी



महात्मा फुले समता परिषेदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी समाजाचे ह्रदय सम्राट मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडासंकुल छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ बीड या ठिकाणी दि.१७/१०/२०२५रोजी दुपारी ४:०० वाजता भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी वडवणी तालुक्यातील व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ओबीसी बांधवानी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान ओबीसी नेते प्रा.वैजेनाथ शिंदे यांनी केले आहे. ३७४ जातीचा समूह असलेल्या ओबीसी समाजाचे सामाजिक व राजकीय आरक्षण धोक्यात आले असून त्यापासून सरकारने त्याचे संरक्षण केले पाहिजे पण सरकारची भूमिका ही संशयास्पद आहे. आपल्या न्याय-हकासाठी आपण या मेळाव्याचे साक्षीदार होणे आवश्यक आहे. फोडा व राज्य करा या नीतीचा मार्ग अवलंब करण्याचा प्रयत्न काही लोकांमधून केला जात आहे त्याच्या पासून सर्व बांधवानी सहभागी होऊन आंम्ही सर्व एक आहोत याची ताकत दाखवून द्या असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आलं आहे.

### ज्ञानेश्वर नायकोडे जिल्हास्तरीय ३००० मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय

किल्ले धारूर । प्रतिनिधी



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा विद्यार्थी चि. ज्ञानेश्वर सचिन नायकोडे याने बीड जिल्हा परिषद क्रीडा विभाग आयोजित जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा ३००० मीटर धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, क्रीडा शिक्षक प्रा. अशोक शिनगारे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



**आष्टी - ब्रह्मगाव- मुगगाव आणि आष्टी हाजीपुर करंजी रस्त्यावर हाजीपुर फाट्याच्या लगत मोठा खड्डा पडला आहे.करंजीकडे जाताना मंगल कार्यालयाजवळ नवीन बांधण्यात आलेल्या पुलावर देखील खुप खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. छोट्या गाड्या या खड्ड्यातून जाताना खाली घसरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने मात्र याकडे दुर्लक्ष केले आहे. या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.**



### राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माजी राष्ट्रपती डॉ एन.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या संचालिका तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या हस्ते डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा डॉ राजकुमार यल्लावाड, ग्रंथपाल सिध्देश्वर कोकाट यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व स्पष्ट केले. डॉ राजकुमार यल्लावाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड निर्माण करावी. वाचन संस्कृती वाढली पाहिजे. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ विद्या देशपांडे यांनी केला. विद्यार्थ्यांनी वाचनातून संशोधन पद्धती निर्माण करुन संशोधनाकडे वळले पाहिजे. यावेळी प्रा डॉ विना भांगे यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्यासाठी शपथ दिली व आभार प्रदर्शन केले. सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा प्रविण फुटके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्रा प्रविण नव्हाडे, प्रा अशोक पवार, प्रा आशिलता शिंदेसह शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पात्रुड-लऊळ रस्त्यावर अपघातात महिलेचा मृत्यू

## खासदार-आमदार त्या कुटुंबाची जबाबदारी घेणार का?

**पात्रुड । प्रतिनिधी**

**पात्रुड-लऊळ या अवघ्या चार किलोमीटरच्या रस्त्यावरील खड्डे अखेर एका निष्पाप जीवाचे बळी ठरले. रविवारी सकाळी दुचाकीवरून जात असताना रस्त्यातील खोल खड्ड्यात तोल गेल्याने झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच या रस्त्याच्या दयनीय अवस्थेबाबत वृत्तपत्रातून इशारा देण्यात आला होता, परंतु प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर भीती खरी ठरली आहे.**





मिळालेल्या माहितीनुसार, मयत ह्या पात्रुड गावच्या महिला रहिवासी असून रोजच्या प्रमाणे त्या आपल्या कामासाठी दुचाकीवरून निघाल्या होत्या रस्त्यातील खोल खड्डा चुकवताना दुचाकीस्वराचा तोल गेल्याने त्या खाली पडला आणि गंभीर जखमी होऊन कोमात गेल्या; स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेले परंतु तोपर्यंत त्या कोमामध्ये गेल्या उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पात्रुड-लऊळ हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यानंतर रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. काही दिवसांपूर्वी या रस्त्याबाबत प्रवाशांचा कर्दनकाळ ठरत असलेला मार्ग अशी बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या वेळी नागरिकांनी प्रशासनास तसेच जनप्रतिनिधींना वेळेत उपाययोजना करण्याचे आवाहन केले होते, पण कुणीच दखल घेतली नाही. परिणामी आज एका कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त झाला आहे.स्थानिक नागरिकांमध्ये आता तीव्र संतापाची लाट आहे. फक्त निवडणुकीच्या काळात या रस्त्याच्या डांबरीकरणाची आश्वासने देणारे आमदार आणि खासदार आता कुठे आहेत? झालेल्या मृत्यूची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शेतकरी आणि युवकांनी अनेक वेळा लेखी मागण्या केल्या होत्या, पण सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही काहीच हालचाल झाली नाही.घटनेनंतर संतप्त नागरिकांनी सोमवारी सकाळी या रस्त्यावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास पुढील काळात मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. दरम्यान, मृत तरुणाच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## चिंचाळा येथे दिवाळी पाडव्यापासून अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**आष्टी । प्रतिनिधी**

ह.भ.प. नवनाथ महाराज पोकळे (चिंचाळा) यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचाळा ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सप्ताह दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे.हा धार्मिक सोहळा बाबासाहेब देवस्थान, महादेव मंदिर, विठ्ठल-रूक्मिणी मंदिर व संत वामनभाऊ मंदिर, चिंचाळा, ता. आष्टी, जि. बीड येथे होणार आहे सप्ताहाचे कलश पूजन नामधारक ह.भ.प. आसाराम महाराज (केळसांगवी) , ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे , ह.भ.प. परमेश्वर शास्त्री महाराज यांच्या हस्ते होणार आहे.या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायण व संध्याकाळी कीर्तन, प्रवचन, हरिनाम संकीर्तन कार्यक्रम होणार आहेत. किर्तन रोज सायंकाळी सात ते नऊ या वेळेत बुधवार दि. २२ नामधारक आसाराम महाराज( केळसांगवी) ,दि.२३ ह .भ. प. नवनाथ महाराज पोकळे ( चिंचाळा), दि. २४ ह .भ .प .वेदिकाताई तावरे (खानापूर), दि. २५ ह. भ. प .अडसरे महाराज (कडा), दि. २६ ह .भ .प. चैतन्य महाराज शास्त्री (जुने गहिनाथ गड), दि. २७ ह. भ. प .कल्याण महाराज कोल्हे (महादेव दरा बीडसांगवी), दि. २८ ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापू (पाटोदा) तर

सप्ताहाचा समारोप बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार आहे.या वेळी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. काशीनाथ महाराज शास्त्री (सांगवीपाटण) यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व तरुण मंडळ, चिंचाळा यांच्या संयुक्त विद्यमाने हा धार्मिक सोहळा पार पडणार आहे.गावातील नागरिक, महिला मंडळ, युवक व संतप्रेमी भक्त मंडळींच्या सहकार्याने संपूर्ण चिंचाळा भक्तिमय वातावरणाने उजळून निघणार आहे.या अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त चिंचाळा ग्रामस्थ व कार्यकारी मंडळ यांनी केले आहे.

## वडवणी तालुका सरपंच संघटनेची पत्रकाराच्या मुलीच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पत्रकार शंकर जाधव यांची मुलगी श्रेया हिच्या गंभीर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी सरपंच संघटना वडवणी तालुक्याच्या वतीने काल गुरुवार रोजी ३१ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आली.



वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील पत्रकार शंकर जाधव यांची नऊ वर्षी मुलगी श्रेया हिला जन्माच्या तीन महिन्यापासून थॅलेसेमिया तिच्या शरीरात नैसर्गिक रक्त पुरवठा होत नसल्याचा हा गंभीर आजार असुन यासाठी बेंगलोर येथील हॉस्पिटलमध्ये तिच्या वर एक वर्ष वैद्यकीय उपचार करण्यात येणार असून यासाठी १५ लाख रुपये हॉस्पिटल खर्च व इतर दहा लाख रुपये खर्च असा एकूण २५ लाख रुपये खर्चे असून यामध्ये शंकर जाधव यांची आर्थिक परिस्थिती हलकीची असून ते किंवा त्यांचे कुटुंब इतका मोठा वैद्यकीय खर्च स्वतः करू शकत नसल्यामुळे समाजातील दानशूर व्यक्ती यांनी मदत करावी असे आवाहन करताच याची माहिती कळताच नव्याने स्थापन करण्यात आलेल्या वडवणी तालुका सरपंच संघटनेच्या वतीने पत्रकार शंकर जाधव यांच्या मुलीच्या वैद्यकीय उपचारासाठी ३१ हजार रुपये मदत शंकर जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली आहे तरी यावेळी सरपंच संघटनेचे वडवणी तालुका अध्यक्ष अँड. माधव काका शेडगे - , अँड. मयुरशेट आंधळे - उपाध्यक्ष,श्री. गणेश जी अंबुरे - उपाध्यक्ष,श्री. संजय जी धपाटे - सचिव, सरपंच ३ अँड. राज पाटील,सरपच केशव सर आंधळे, सरपच . सुभाष आजबे, सरपच ज्ञानोबा शिंदे सर, सरपच उत्तरेश्वर खताळ, सरपंच . विवेक अंडिल, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हाध्यक्ष अँड. विनायक जाधव, संपादक सतीश राव वाघमारे,डिजिटल मीडिया वडवणी तालुका अध्यक्ष सतीश राव मुजमुले, पत्रकार भैय्यासाहेब तांगडे,पत्रकार अर्जुन राव मुंडे, पत्रकार रामेश्वर गोंडे, पत्रकार धम्मपाल डावरे, पत्रकार विष्णू डोईफोडे सर, पत्रकार वाजेद पठाण इत्यादी उपस्थित होते यावेळी पत्रकार संघटनेच्या वतीने सरपंच संघटना वडवणी तालुका यांचे मदत केल्याबद्दल जाहीर आभार मानण्यात आले आहेत. तसेच या कौतुकास्पद उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## सलग सात तास वाचन हा उपक्रम यशस्वीरित्या राबवून ग्रंथप्रेम जागवणारा वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

पाटोदा । प्रतिनिधी



पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने महाविद्यालयात सलग सात तास वाचन हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्रमुख पाहुणे म्हणून श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा. सोमनाथ घाडगे,कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे ,प्रा.गोपाळ धांडे, व अंतर्गत मुल्यमापन समितीचे प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. अशोक देवगुडे यांनी प्रास्ताविका मध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. ते म्हणाले की, स्वप्न ते नव्हे जे झोपल्या नंतर पडते तर खरे स्वप्न ते असते जे तुम्हाला पूर्ण केल्याशिवाय झोपूच देत नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी वाचन केले पाहिजे. त्यासाठी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. ज्योती रकटे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि उपथित मान्यवरांच्या हस्ते वाचनीय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी या हेतूने सलग सात तास वाचन हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. प्रा.सोमनाथ घाडगे यांनी सांगितले की ग्रंथ हे माणसाच्या जीवनात बदल घडविणारे, अवगुणांचे सगुणात रूपांतर करणारे, विनाशापासून वाचविणारे असे ते ग्रंथ म्हणून तरुण पिढीने ग्रंथ वाचली पाहिजेत. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्त्व घडवायचे असेल तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असा संदेश त्यांनी दिला. डॉ.कलाम यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे, भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती आहे हे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१०९४ दिनांक-०७/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती आसेफा निजामखॉ पठाण रा. नागझरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आसेफा निजामखॉ पठाण | स्वत: | ०९/०३/१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१०९५ दिनांक-०७/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती निजामखॉ कासमखॉ पठाण रा. नागझरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निजामखॉ कासमखॉ पठाण | स्वत: | ०१/०१/१९४५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१०९१ दिनांक-०७/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती निसारखॉ निजामखॉ पठाण रा. नागझरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निसारखॉ निजामखॉ पठाण | स्वत: | ०३/०४/१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१०९२ दिनांक-०७/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुजिमखॉ निजामखॉ पठाण रा. नागझरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुजिमखॉ निजामखॉ पठाण | स्वत: | ०१/०१/१९८३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-१०९३ दिनांक-०७/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती अजिमखॉ निजामखॉ पठाण रा. नागझरी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अजिमखॉ निजामखॉ पठाण | स्वत: | ०९/०३/१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# गोकुळवर धडकला दूध उत्पादकांचा जनावरांसह मोर्चा

## डिबेंचर कपातीवरुन मुश्रीफ विरुद्ध महाडिक संघर्ष वाढला

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघाने (गोकुळ) १३६ कोटींच्या दूध दर फरकातील डिबेंचर म्हणून कपात केलेली ४५ टक्के रक्कम दूध संस्थांना परत करावी आणि दूध दरात वाढ करावी, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी (दि. १६) दूध संस्था आणि उत्पादकांचा मोर्चा गोकुळच्या कार्यालयावर धडकला. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये झटापट झाल्याचे दिसून आले.

गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. माणिक शिंदे, कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्योतीराम घोडके वडणगेकर यांच्यासह जिल्ह्यातील दूध संस्थांचे पदाधिकारी, दूध उत्पादक शेतकरी यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे दूध उत्पादकांनी या मोर्चावेळी गायी, म्हैशी सोबत आणल्या होत्या. एका गायीचे पूजन करुन कोल्हापुरातील सर्किट हाऊस येथून या मोर्चाला सुरुवात झाली. तेथून हा मोर्चा थेट ताराबाई पार्क येथील गोकुळ कार्यालयावर धडकला. या



मोर्चात मोठ्या संख्येने दूध संस्थांचे प्रतिनिधी आणि दूध उत्पादक सहभागी झाले होते. दरम्यान, डिबेंचर कपात निर्णयाची संचालकांना माहिती नसल्याची चर्चा सुरु आहे. जेव्हा दोन आठवड्यापूर्वी गोकुळ दूध संघाची सर्वसाधारण सभा झाली होती तेव्हा अशाप्रकारची डिबेंचर कपात करणार, असा कुठलीही उल्लेख अथवा ठराव आणला नव्हता. हे नेमके कोणी केले? याचा शोध आता घेतला जात आहे. याचे खापर आता गोकुळ प्रशासनावर फोडण्याचे काम सुरु आहे. गोकुळने दरवर्षीपेक्षा अधिक रक्कम डिबेंचर म्हणून कपात केल्याने दूध संस्था संतप्त झाल्या आहेत. यामुळे दूध संस्थांना सभासदांना दिवाळीचा दूध दरक वाटप करताना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. गोकुळच्या या निर्णयाविरोधात मागील आठवड्यात दूध उत्पादकांनी गोकुळ कार्यालयासमोर एकदिवसीय उपोषणही केले होते. डिबेंचर म्हणून कपात केलेले पैसे दूध संस्थांच्या खात्यावर जमा करावेत. हे पैसे दूध संस्थांना देता येत नसतील तर ते जिल्ह्यातील दूध उत्पादकांना द्यावेत, जेणेकरुन त्यांना आर्थिक दिलासा मिळेल, अशी मागणी दूध उत्पादकांनी केली आहे.

## कपाशीवर स्पोडोप्टेरा अळीचा प्रादुर्भाव वाढला; असे करा व्यवस्थापन



कपाशीच्या पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात कपाशीवर ही कीड आढळून येत असून, या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास उत्पादनात घट येण्याची शक्यता कृषितज्ज्ञांनी वर्तविली आहे. यंदा कपाशीच्या क्षेत्रात घट झाली आहे. वारंवार अतिवृष्टी झाल्याने आधीच शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्च दुप्पट झाला. त्यामुळे खर्चसुद्धा निघेल किंवा नाही, अशी चिंता शेतकऱ्यांना आता भेडसावत आहे. बहुतांश भागातील कपाशी पिकावर स्पोडोप्टेरा लिट्युरा (तंबाखूची पाने खाणारी अळी) या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे ही अळी दिवसा पिकावर दिसून येत नाही. मात्र, रात्रीच्या सुमारास पिकाचे नुकसान करते. या किडीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

अळीमुळे असे होते कपाशीचे नुकसान : या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंड्यांमधून लहान लहान अळ्या समूहात बाहेर येतात व प्रथमतः त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजूने राहून खातात. पाने जाळीदार होतात. या अळ्या नंतर मोठ्या होऊन स्वतंत्रपणे पाने, शेंडे, फुले, पात्या व बोंडे पोखरून खातात. परिणामी, उत्पादनात मोठी घट येते.

असे करा व्यवस्थापन : शेतात हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे लावावेत. अंडी व अळीग्रस्त पाने तोडून किडीसह नष्ट करावीत. प्रादुर्भावाच्या सर्वेक्षणाकरिता प्रत्येक किडीसाठी हेक्टरी १० कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये प्रति दिन ८ ते १० पतंग २ ते ३ दिवस आढळल्यास नियंत्रणासाठी उपायोजना करावी. सापळ्यातील अळीचे पतंग रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत. याशिवाय आर्थिक नुकसान पातळी (५ टक्के पाते, फुले व बोंडांचे नुकसान) दिसून येताच क्लोरेंट्रानिलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रति एकर किंवा स्पिनोटोरम ११.७० टक्के एससी २०० मिली प्रति एकर किंवा सायंट्रानिलीप्रोल १०.२६ ओडी ३७५ मिली प्रति एकर किंवा क्लोरोपायरीफॉस ५० टक्के ईसी सायपरमेथ्रीन ५ टक्के ईसी ४०० मिली प्रति एकर यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

## हळद किडींचे नियंत्रण करा अन् घ्या भरमसाठ उत्पादन

सध्या हळद पिकामध्ये किडींच्या प्रादुर्भाव होण्यास पोषक स्थिती आहे. या काळात किडींचा प्रादुर्भाव झाल्यास हळद पिकावर अनिष्ट परिणाम होतो. त्याचा थेट संबंध उत्पन्न आणि कंदाचा दर्जा यांच्याशी येतो. त्यामुळे हळद पिकात किडींपासून वेळीच नियंत्रण करणे गरजेचे आहे. मागील काही दिवसांत राज्यात झालेल्या दमदार पावसाने बहुतांश ठिकाणी पिकात पाणी साचून राहिल्याची स्थिती होती. त्यासाठी पिकांत साचलेल्या पावसाच्या पाण्याचा त्वरित निचरा करून घ्यावा. मागील आठवडाभरापासून पावसाने विश्रांती घेतलेली आहे. सद्यःस्थितीत ढगाळ हवामान, तापमानातील चढ-उतार, आर्द्रता यामुळे हळद पिकांतील कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक हवामान स्थिती निर्माण झाली आहे. हळद पिकामध्ये उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा जमिनीत वाढणारे कंद आहेत. हळद पिकावर कीड-रोगांच्या प्रादुर्भाव झाल्यामुळे त्याचा थेट परिणाम कंदाच्या दर्जावर होतो. त्यासाठी पिकाचे नियमित निरिक्षण करून त्वरित उपाययोजना कराव्यात जेणेकरून संभाव्य नुकसान टाळले जाईल. कंदमाशी : हळद पिकावर नुकसान करणारी ही प्रमुख कीड आहे. कंदमाशीचे जीवनचक्र चार आठवड्यांत पूर्ण होते. कंदमाशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर असते. पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायाची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. अळी पिवळसर असून तिला पाय नसतात.



कंदमाशी खोडाच्या बुंध्याजवळ किंवा उघड्या कंदावर अंडी घालते. अंड्यातून ५ ते ७ दिवसांत लालसर अळी बाहेर पडून ती उपजीविकेसाठी कंदात शिरतात.

नुकसानीचा प्रकार : कंदामध्ये अळ्यांचा शिरकाव झाल्याने तेथे रोगकारक बुरशी तसेच सूत्रकृमींचा प्रादुर्भाव होऊन कंद मऊ होतात. कंदांना पाणी सुटून ते कुजू लागतात. लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक अनुकूल असतो. या किडीमुळे हळद पिकाचे सुमारे ४५ ते ५० टक्के पर्यंत नुकसान होते. ही कीड सप्टेंबर महिन्यापासून पीक काढणीपर्यंत नुकसान करते.

नियंत्रण : शेतातील पीक अवशेष, सडके कंद नष्ट करावेत. उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. शिफारशीत केलेल्या वेळेवर हळदीची भरणी करावी. हळदीनंतर पुन्हा हळद किंवा आले यासारखी पिके सलग त्याच क्षेत्रामध्ये घेऊ नयेत. पीक फेरपालट करावी. हेक्टरी ६ पसरट भांडी (माती अथवा प्लॅस्टिकची) वापरून प्रत्येक भांड्यात भरडलेले एरंडीचे बी २०० ग्रॅम घेऊन त्यात १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशा आकर्षित होतात. त्यात पडून मरू लागतात. ही उपाययोजना अत्यंत प्रभावी, कमी खर्चिक व सहजरीत्या करण्यासारखी आहे. तसेच कंदांचे नुकसान करण्याअगोदरच कंदमाश्या नियंत्रित होत असल्याने विशेष प्रभावी उपाययोजना आहे. सेंद्रिय हळद उत्पादनामध्येही ही महत्त्वाची आहे.

रासायनिक फवारणी : क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने गरजेनुसार फवारणी करावी.

पाने खाणारी अळी : पावसाळ्यात वाढलेल्या आर्द्रतेमुळे या किडीचा प्रादुर्भाव दिसू लागतो. पाने सुरळी किंवा पोंगा अवस्थेत असताना ही अळी पानावर उपजीविका करते.

पान खाऊन सुरळीमध्ये छिद्र करते. सुरळीतील पान पूर्णपणे उलगडल्यानंतर एका सरळ रेषेमध्ये पानांवर छिद्रे आढळून येतात.

नियंत्रण : गुंडाळलेली पाने तसेच अळी व कोष वेचून नष्ट करावेत. रासायनिक फवारणी : प्रतिलिटर पाणी. क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २ मिलि.


# गाई, म्हशींतील गर्भपातावर उपाययोजना

जनावरांमध्ये पौष्टिक घटकांची कमतरता, चयापचय आणि संप्रेरकांची विकृती, आघात, विषारी द्रव्ये, जंतूच्या संक्रमणाचा परिणाम आणि काही अज्ञात कारणांमुळे गर्भपात होऊ शकतो. गर्भपाताच्या कारणांची विभागणी असंसर्गजन्य आणि संसर्गजन्य अशा दोन मुख्य प्रकारांमध्ये केली जाते.

गर्भपाताची असंसर्गजन्य कारणे : निसरड्या जमिनीवर पडल्याने आणि गाभण जनावरांमधील भांडणामुळे दुखापत होऊन गर्भपात होऊ शकतो. उच्च पर्यावरणीय तापमानाच्या तणावामुळे गाभण जनावरांमध्ये विपरीत परिणाम होतो. चांगल्या व्यवस्थापन पद्धती अवलंबून भौतिक कारणांमुळे होणारे गर्भपात टाळता येते. कीटकनाशके आणि अनेक वनस्पतींमध्ये आढळणारे विषारी घटक गर्भपातास कारणीभूत ठरू शकतात. नायट्रोजनयुक्त व्यावसायिक खते मोठ्या प्रमाणात दिल्यावर कुरणातून नायट्रेट/नायट्राइटचे विषबाधा होऊन जनावरांमध्ये वारंवार गर्भपात होऊ शकतो. नायट्रेटच्या विषबाधामुळे श्वास घेण्यास गंभीर त्रास होतो, स्नायूंचे थरथरणे आणि श्लेष्मल त्वचा तपकिरी दिसणे आणि रक्तातील घटकांमध्ये बदल अशी लक्षणे दिसतात.

गाभण जनावरांना योग्य पोषण न मिळाल्यास उदा. जीवनसत्त्व अ आणि इ, सलेनियम, आयोडीन, लोह आणि पोषण तत्त्वाच्या कमतरतेमुळे गर्भाची योग्य वाढ होत नाही. यामुळे मृत आणि कमकुवत नवजात वासरांचा जन्म होतो किंवा गर्भपात होऊ शकतो.

गर्भपाताची संसर्गजन्य कारणे : जनावरांमध्ये जिवाणूजन्य गर्भपात मुख्यत्वे ब्रुसेलोसिस, लेप्टोस्पायरोसिस, व्हिब्रीओसिस,



कॅम्पायलोबॅक्टेरिओसिस, लिस्टेरियोसिस, क्लायमिडिओसिस आजारांमुळे गर्भपात होतो. या शिवाय अर्कानोबाक्टर पायोजनेस, साल्मोनेला, अ‍ॅक्टिनोमायसिस, एस्चेरिशिया कोलाय, स्ट्रेप्टोकोकस, स्टेफिलोकोकस, बॅसिलस, पाश्च्युरेला इत्यादी जिवाणूंच्या संसर्गाने गर्भपात होऊ शकते. अत्यंत संसर्गजन्य, झुनोटिक (प्राण्यापासून माणसास होणारा) आजार असून, तो ब्रुसेला अबॉर्टस नावाच्या जिवाणूमुळे होतो. प्रयोगशाळेमध्ये जिवाणूवर काम करणाऱ्या व्यक्ती, कत्तलखान्यात काम करणारे कामगार, पशुवैद्यक, जनावरे उत्पादक आणि मांस-वेष्टित (पॅकेजिंग) करणारे कर्मचारी हे अगदी सहज या जिवाणूच्या संपर्कात येत असल्याने संक्रमित होऊ शकतात. गाई आणि म्हशींमध्ये या जिवाणूचा संसर्ग प्रामुख्याने दूषित खाद्य, पाण्याचे अंतर्ग्रहण, श्वसन, नेत्रश्लेष्मल, श्लेष्मल त्वचा, इत्यादीद्वारे विविध माध्यमांतून होतो. गर्भपातानंतर थेट संपर्क आल्याने आणि पर्यावरणीय दूषिततेमुळे, लैंगिक संक्रमण आणि कृत्रिम गर्भादान यामार्फत जिवाणूचे संक्रमण होते. गर्भधारणेच्या शेवटच्या तिमाहीत गर्भपात होतो, झार/ वार बाहेर न पडणे, पुनरावृत्ती प्रजनन इत्यादी परिणाम ब्रुसेलोसिसमुळे होतात.

निदान : गर्भपाताचे निदान पूर्वोतिहास, गर्भपाताचा टप्पा, गर्भ आणि गर्भवेष्टणाचे स्थूल स्वरूप इत्यादींच्या आधारावर तसेच प्रयोगशाळेत विविध नमुन्यांची जसे की गर्भपातीत सामग्री, गर्भाशयातील स्राव, रक्तजल आणि दूध यांचे वेगवेगळ्या चाचण्या करून केले जाते.

प्रतिबंध आणि नियंत्रण : गाभण जनावरांना स्वच्छ व सुरक्षित गोठ्यात ठेवावे. स्वच्छ पाणी आणि चारा द्यावा, चांगल्या व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. मान्यताप्राप्त लस वापरावी.

संक्रमण आणि इजा टाळण्यासाठी गाभण जनावरांना इतर जनावरांच्यापासून वेगळे ठेवावे. पूर्वी गर्भपात झालेल्या जनावराची विशेष काळजी घ्यावी. गाभण जनावरांची वाहतूक करणे टाळावे. सहा महिन्यांवरील गाभण जनावरास चराईसाठी नेऊ नये. त्यांची योग्य काळजी घ्यावी. गाभण जनावरांच्या पोषण आणि पौष्टिकतेची विशेष काळजी घ्यावी. गर्भपातानंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत प्रजनन करू नये. त्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याचे पालन करावे. लैंगिक माध्यमातून होणारे संक्रमण टाळण्यासाठी कृत्रिम रेतनाचे अनुसरण करावे अन्यथा ब्रुसेला संसर्गमुक्त प्रजनन वळू किंवा वळूच्या रेतमात्रा वापराव्यात. जनावरे खरेदी करताना गर्भपाताचा इतिहास घ्यावा. विषेशतः सांसर्गिक गर्भपाताची (ब्रुसेलोसिस) चाचणी करावी. नव्याने खरेदी केलेल्या जनावरांचा लगेच कळपात समावेश करू नये. प्रयोगशाळेत गर्भपाताच्या कारणाचे निदान झाल्यास भविष्यात गर्भपात रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्याचे गर्भपाताच्या प्रतिबंधासाठी आवश्यक लसीकरण करून घ्यावे. मृत गर्भ, गर्भपातीत सामग्री आणि बाधित साहित्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावे. संपूर्ण बाधित क्षेत्र निर्जंतुक करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६७ : सोविएत रशियाला ७२ लाख डॉलर देऊन अमेरिकेने अलास्का हा प्रांत खरेदी करुन ताब्यात घेतला.
१८७९ : थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना
१९०६ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन'ची स्थापना केली.
१९१९ : राम गणेश गडकरी लिखित 'संगीत भावबंधन' या नाटकाचा पहिला प्रयोग दीनानाथ मंगेशकरांच्या 'बळवंत संगीत नाटक मंडळी'ने केला.
१९२२ : ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशनची स्थापना
१९६७ : सोविएत रशियाचे 'व्हेनेरा-४' हे अंतराळयान शुक्रावर उतरले.
१९७२ : प्रथम बहुउद्देशीय हेलिकॉप्टर एस. ए. ३१५ ची चाचणी बैंगलोर येथे घेण्यात आली.
१९७७ : २०६०-चिरॉन हा अंतरिक्षातील सर्वात दूरवरील लघुग्रह शोधण्यात आला.
२००२ : कसोटी व एकदिवसीय क्रिकेट सामन्यात वीस हजार धावा करणारा सचिन तेंडुलकर पहिला क्रिकेटपटू ठरला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०४ : मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) थायलंडचा राजा (मृत्यू: १ आक्टोबर १८६८)
१८६१ : 'भारताचार्य' चिंतामणराव वैद्य न्यायाधीश, कायदेपंडित, लेखक, आणि इंग्रजी व संस्कृतचे जाणकार. महाभारताच्या मराठी भाषांतराचा समारोप म्हणून त्यांनी लिहिलेल्या 'महाभारताचा उपसंहार' या ग्रंथामुळे लोकमान्यांनी त्यांना 'भारताचार्य' ही पदवी दिली. (मृत्यू: २० एप्रिल १९३८)
१९२५ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं, पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय भारतीय नाट्य दिग्दर्शक आणि नाट्य शिक्षक तसचं, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक इब्राहीम अलकाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : इब्राहिम अल्काझी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक
१९३९ : ली हार्वे ओस्वाल्ड राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीचा मारेकरी (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९५० : ओम पुरी अभिनेता
१९५६ : मार्टिना नवरातिलोव्हा झेकोस्लोव्हाकियाची लॉन टेनिस खेळाडू
१९६५ : इस्लामिक रिसर्च फाउंडेशन (आयआरएफ) चे संस्थापक आणि अध्यक्ष झाकीर नाईक यांचा जन्म.
१९७४ : भारतीय लेखक अमिश त्रिपाठी यांचा जन्म.
१९७७ : भारतीय अभिनेता कुणाल कपूर यांचा जन्म.
१९८४ : भारतीय अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : चार्ल्स बॅबेज इंग्लिश गणितज्ञ, संशोधक, अभियंता आणि तत्त्वज्ञ, पहिल्या यांत्रिकी संगणकाचा जनक (जन्म: २६ डिसेंबर १७९१)
१९०९ : लालमोहन घोष देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष, भारताच्या विविध राजकीय हक्कांकरिता त्यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश जनतेत प्रचार केला. (जन्म: १७ डिसेंबर १८४९ कलकत्ता)
१९३१ : थॉमस अल्वा एडिसन अमेरिकन संशोधक आणि उद्योजक (जन्म: ११ फेब्रुवारी १८४७)
१९५१ : हिराबाई पेडणेकर पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार (जन्म: २२ नोव्हेंबर १८८५)
१९७६ : भारतीय कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: १० सप्टेंबर १८९५)
१९८३ : विजय मांजरेकर क्रिकेटपटू (जन्म: २६ सप्टेंबर १९३१)
१९८७ : वसंतराव तुळपुळे कम्युनिस्ट कार्यकर्ते. कार्ल मार्क्सच्या 'दास कापिटाल' या ग्रंथाचा त्यांनी मराठीत अनुवाद केला होता. (जन्म:)
१९९३ : मंदाकिनी विश्वनाथ आठवले भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या बालअभिनेत्री. दादासाहेब फाळके यांच्या त्या कन्या होत. त्यांनी फाळके यांच्या 'कालियामर्दन' या मूकपटात काम केले होते. (जन्म:)
१९९५ : ई. महमद छायालेखक (शेजारी, दहा वाजता, आसमान, चोरीचा मामला) (जन्म:)
१९९६ : भारतातील प्रमुख क्रांतिकारक रामकृष्ण खात्री यांचे निधन.
२००४ : भारतातील कुख्यात चंदनवादी तस्करी व नक्षलवादी वीरप्पन यांना ठार मारण्यात आले.
२००४ : वीरप्पन चंदन तस्कर (जन्म: १८ जानेवारी १९५२)

## टोमॅटोचे अर्का रक्षक वाण; एकरात मिळेल भरघोस उत्पादन!

राज्यासह देशात टोमॅटो पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. टोमॅटो पिकातून अनेक शेतकरी करोडपती झाल्याच्या यशोगाथा मागील वर्षी समोर आल्या होत्या. मात्र टोमॅटोचे अधिक उत्पादन घेता यावे. त्यास विक्रीसाठी चांगले मार्केट उपलब्ध व्हावे, यासाठी निर्यातक्षम वाणाची निवड करणे खूप गरजेचे असते. याच पार्श्वभूमीवर 'अर्का रक्षक' या टोमॅटोच्या सर्वोत्तम वाणाबद्दल माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

रोगप्रतिकारक्षम वाण : कोणत्याही पिकाचे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी त्या पिकाच्या व्यवस्थापनासह त्याच्या योग्य वाणाची लागवड होणे खूप महत्वाचे असते. अर्का रक्षक हे वाण इतर वाणांच्या तुलनेत रोगप्रतिकारक्षम असून, त्यावर शेतकऱ्यांमध्ये प्रचलित नावाने ओळखला जाणारा 'घुबडा' हा पडत नाही. त्यालाच पर्णगुच्छ किंवा लीफकर्ल असेही म्हणतात. याशिवाय भुरी आणि करपा या रोगांना देखील हे वाण बळी पडत नाही. ज्यामुळे सर्वाधिक टोमॅटो उत्पादन देणारे वाण म्हणून हे वाण समोर आले आहे.किती मिळते उत्पन्न? टोमॅटोला देशांतर्गत बाजारासह बाहेरील देशांमध्ये मोठी मागणी आहे. भाजीसोबतच चटणी आणि सूप बनवण्यासाठी त्याचा वापर होतो. हीच बाब लक्षात घेऊन बंगळुरू येथील भारतीय फळबाग संशोधन संस्थेने (आयएचआरआय) अधिक उत्पादन देणाऱ्या आणि निर्यातक्षम अशा 'अर्का रक्षक' या टोमॅटो वाणाची निर्मिती केली आहे. टोमॅटोला योग्य तो भाव मिळाल्यास, या वाणापासून शेतकऱ्यांना एकरी ५ लाखांपर्यंत उत्पन्न मिळू शकते. भारता व्यतिरिक्त या टोमॅटो वाणाला घाणा, मलेशिया तसेच पाकिस्तान इत्यादी देशांमध्ये खूप मागणी आहे. या वाणाच्या एका झाडापासून संपूर्ण हंगामात १८ किलो उत्पादन मिळते. यामुळेच या टोमॅटोची गुणवैशिष्ट्ये आणि मागणी पाहून राष्ट्रीय बियाणे महामंडळाकडून देशातील टोमॅटो उत्पादनात वाढ होण्यासाठी अर्का रक्षक या वाणाच्या बियाण्याची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली जात आहे.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# बौद्ध बांधवांनी परस्पर स्नेहभाव जपावा अन् स्वतःची उन्नती साधावी-भन्ते राजरत्न

अंबड । प्रतिनिधी

येथील ज्ञानभूमी बुद्ध विहारात वर्षवास निमित्ताने बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथ वाचनाची दिनांक १४ ऑक्टोबर रोजी यशस्वीपणे सांगता झाली. त्याप्रसंगी भंते राजरत्न यांनी आपले मत व्यक्त केले. तत्पूर्वी उपस्थित उपासक उपासिकांनी भगवान बुद्ध व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

कार्यक्रमास संबोधित करताना भारतीय बौद्ध महासभेचे अंबड तालुका अध्यक्ष आयुष्यमान उत्तमराव येडे यांनी पंचशील मधील मी खोटे बोलणार नाही, या शिलाचे उपस्थितानी पालन करावे असे आव्हान केले. तर भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस डॉक्टर राहुल बागुल यांनी धम्माचे सदाचरण करण्याचा प्रयत्न करील, त्यांचे सांसरीक जीवन सुरुवातीस कल्याण कारक मध्य कल्याण कारक व अंतिमतः कल्याणकर होते, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास



भारतीय बौद्ध महासभेचे जालना जिल्हा महिला अध्यक्षा ज्योतीताई खरात, जालना जिल्हा संघटक आयुष्यमान चंद्रकांत दीपक, महेंद्र खरात, संजय पटेकर, संदीप मस्के, राजेंद्र सदाफुले, मकासरे भाऊ, रवींद्र खरात, वैजंताताई साळवे, लताबाई रुपवते, नंदाबाई खरात, भावनाताई दीलपाक, रेखाताई जाधव, लिलाबाई खरात, अश्विनी पटेकर, जनाबाई सदाफुले, संगीता सदाफुले, सुनीताबाई मस्के, प्रीती खरात, शितल सदाफुले यांच्यासह अंबड येथील उपासक व उपसिका, बाल बालिका यांची उपस्थिती होती. यावेळी भंते राजरत्न यांना अष्ट पुरस्कार व चिवरदान करण्यात आले. सर्व उपस्थितांना खीरदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बोधलपुरीचे मुख्याध्यापक मनोहर पटेकर यांनी केले. शेवटी सरनतय गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी स्मशानभूमीत चितेवर बसून आंदोलन

हिंगोली। प्रतिनिधी

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. तसेच कयाधू नदीवरील खरबी बंधारा रद्द करण्याच्या मागणीसाठी डॉ. रमेश शिंदे यांनी बुधवार (दि.१५) पासून केसापूर येथील स्मशानभूमीत चितेवर बसून उपोषण सुरू केले आहे. दिवसभरात प्रशासनाचा एकही अधिकारी आंदोलनाकडे फिरकला नसल्याने शेतकऱ्यांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

राज्यात अतिवृष्टी झाल्यानंतरही शासनाकडून ओला दुष्काळ जाहीर केला जात नाही. अतिवृष्टीमळे अनेकांच्या राज्यात अतिवृष्टी झाल्यानंतरही शासनाकडून ओला दुष्काळ जाहीर केला जात नाही. अतिवृष्टीमुळे अनेकांच्या जमिनी खरवडून गेल्या, तर हाती आलेली पिके वाहून गेली आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना जगणे कठीण झाले आहे. बँकेचे कर्ज कसे फेडावे? कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा? असे प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे आहेत. मात्र शासन शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याऐवजी ८५०० रुपयांची तुटपुंजी मदत देत आहे. याशिवाय



हिंगोली शहराजवळ कयाधू नदीवर खरबी येथे बंधारा बांधून कयाधू नदीचे पाणी इसापूर धरणात वळवले जाणार आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील शेती सिंचनाचा प्रश्न निर्माण होणार असून, जिल्ह्यातील शेतीचे वाळवंट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याच मागण्यांसाठी हिंगोली तालुक्यात तीन ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. मात्र त्यानंतरही शासनाकडून ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. त्यामुळे नाइलाजास्तव डॉ. शिंदे यांनी बुधवारी (दि.१५) सकाळपासून केसापूर येथील स्मशानभूमीत चितेवर बसून आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास परिसरातील शेतकऱ्यांनी पाठिंबा देऊन सहभाग नोंदवण्याची तयारी सुरू केली आहे.

## भाडेपट्टाजाहीरप्रगटण

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते कि, विभाग **बीड** उपविभाग **केज** मौजे कारेगव्हान दिनांक १२/१०/२०२५ **ता. बीड जि. बीड** येथिल जिरायत शेत जमिन मिळकातीचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ क्र | गनं | एकूण७/१२ क्षेत्रहे. आर | शेतकऱ्याचे७/१२वरील क्षेत्रहे. आर | शेतकऱ्यांचेनांव | भाडेपट्टा क्षेत्र हेआर | रास्ता क्षेत्रहे. आर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७९ | ०३हे ०२आर | ०हे ३९आर | मल्हारी पोपट खंदारे | ००हे १०आर | |
| २ | | | ०हे ३७आर | लक्ष्मन चंद्रसेन खंदारे | ००हे ११आर | |
| ३ | १८४ | ०२हे४९आर | ००हे २८.७५आर | सतीश पोपट खंदारे | ००हे २०आर | |
| ४ | | | ००हे २८.७५आर | मल्हारी पोपट खंदारे | ००हे १०आर | |
| ५ | | | ००हे २९आर | लक्ष्मन चंद्रसेन खंदारे | ००हे२९आर | |
| ६ | | | ००हे ०७आर | चंद्रसेन भागुजी खंदारे | ००हे ०७आर | |
| ७ | | | ००हे ५९.२५आर | श्रीमंत किसन खंदारे | ००हे ४९आर | |
| ८ | | | ००हे १८आर | अशोक रामा खंदारे | ००हे १२आर | ००हे ०६आर |
| ९ | | | ००हे १७.२५आर | बापु रामा खंदारे | ००हे १७.२५आर | |
| १० | | | ००हे १८आर | हनुमंत रामराव खंदारे | ००हे १८आर | |
| ११ | १८५ | ००हे९० आर | ००हे १२आर | सतीश पोपट खंदारे | ००हे १२आर | |
| १२ | | | ००हे १२आर | मल्हारी पोपट खंदारे | ००हे १२आर | |
| १३ | | | ००हे २२आर | किसन भागुजी खंदारे | ००हे १२आर | |
| १४ | | | ००हे २२आर | चंद्रसेन भागुजी खंदारे | ००हे १०आर | |
| १५ | १८८ | ०३हे२६आर | ००हे ६०आर | लक्ष्मन चंद्रसेन खंदारे | ००हे ०६आर | |
| १६ | | | ००हे ६३आर | हनुमंत रामराव खंदारे | ००हे ०६आर | |
| १७ | ११० | १६हे १३आर | ०१हे २०आर | रामा भीमा तांबडे | ००हे१२आर | |
| १८ | | | ००हे ९५आर | महानंदा बापू खंदारे | ००हे०७आर | |
| १९ | | | ००हे ४०आर | चंद्रसेन भागुजी खंदारे | | ००हे ०५आर |
| २० | | | ००हे ४०आर | पोपट भागुजी खंदारे | | ००हे ०४आर |
| २१ | | | ००हे ४०आर | श्रीमंत किसान खंदारे | | ००हे ०७आर |
| २२ | | | ००हे १३आर | अशोक रामा खंदारे | | ००हे १०आर |
| | | **एकूण** | | | **०२हे ६०.२५आर** | **००हे ३२आर** |

सदर नमूद शेतजमिनउक्तमालकांना त्यातील दगड,माती,झाडे.झुडपे,बांधयेण्याजाण्याचा हक्क सर्वतंदग भुतवस्तुसह माझेअशीलभाडेपट्टा देण्याचे कबुल करून आमचेआशीलाबरोबर सदर व्यवहारबाबत बोलणेकरून सदर व्यवहाराचा एक भाग म्हणून माझे आशीलांडून विसार दाखल करून रक्कम देखील स्विकारलेलीआहे. सदर उपरोक्त नमूदशेत जमिन मिळकतहे संपूर्णपणे निर्विवादित, निरजोखामी व बोजार हितग्वाही व खात्री सदर नमूद शेतकरीमालकांनी माझ्या अशीलास दिलीआहे. तरी वर नमूद शेतजमिनीस कोणचाही कोणताहीप्रकारचा हक्क , हितसंबंध, अधिकार, गहाण, टाच,बोजा,लिज, वहिवाटी, पोटगी, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, अन्य कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा हितसंबंध त्यांनी हि भाडेपट्टापूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचेआत कायदेशिर कागदोपत्री पुराव्यानिशी खालील नमूद पत्त्यावर लेखी हरकत नोंदवुनलेखी पोहच घ्यावी.

सदर नमूद जमिनीबाबत कोणाचेही कसलेही हरक ततक्रारन असल्यास वरील नमूद मुदतीनंतर आमचेअशीलसदर नमुद शेत जमिनीचा भाडेपट्टाचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रारग्राह्य धरण्यात येणार नाही. कोणाची ही फसगत होऊ नये म्हणून हे खरेदी पूर्व जाहीर नोटीस दिलीयाची नोंद घ्यावी.
ही भाडेपट्टा पूर्व जाहीर नोटीस दिली दिनांक १२/१०/२०२५
सदर भाडेपट्टापुर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यातआम्हा शेतकऱ्यांची कसलीही हरकतनाही.

| भाडेपट्टा क्षेत्राची चतुर्थः सिमा गट नं१७९ | |
|---|---|
| पूर्वेस | गट नं. १८४ |
| पश्चिमेस | गट नं १७९ चे उर्वरित क्षेत्रफळ |
| दक्षिणेस | गट नं १८६ |
| उत्तरेस | गट नं ११० |

| भाडेपट्टा क्षेत्राची चतुर्थः सिमा गट नं१८४ | |
|---|---|
| पूर्वेस | गट नं १८४ चे उर्वरित क्षेत्रफळ |
| पश्चिमेस | गट नं. १७९ |
| दक्षिणेस | गट नं १८८ |
| उत्तरेस | गट नं ११० |

| भाडेपट्टा क्षेत्राची चतुर्थः सिमा गट नं१८८ | |
|---|---|
| पूर्वेस | सोनपेठवाडी गावची सिमा |
| पश्चिमेस | गट नं. १८६ |
| दक्षिणेस | गट नं १८८ चे उर्वरित क्षेत्रफळ |
| उत्तरेस | गट नं. १८५ |

| भाडेपट्टा क्षेत्राची चतुर्थः सिमा गट नं१८५ | |
|---|---|
| पूर्वेस | सोनपेठवाडी गावची सिमा |
| पश्चिमेस अँ | गट नं. १८४ |
| दक्षिणेस ड | गट नं १८८ |
| उत्तरेस . | गट नं. १८४ |

| भाडेपट्टा क्षेत्राची चतुर्थः सिमा गट नं ११० | |
|---|---|
| पूर्वेस | गट नं. ११० चे उर्वरित क्षेत्रफळ |
| पश्चिमेस | गटनं. १८० |
| दक्षिणेस | गटनं १८४ |
| उत्तरेस | गटनं ११० चे उर्वरित क्षेत्रफळ |

**मिलिंद रावसाहेब उबाळे**
**ता. बीड जि. बीड**
**मोबाइल नंबर**
**९४२२७४४७२९**

## PUBLIC NOTICE

**Date12/10/2025**

**Village - Karegavhan, Taluka – Beed, District– Beed, Maharashtra**

This is to bring to the knowledge of the public at large that our client is intending to purchase and lease the land comprised in various **Gut. No. 179** total land admeasuring **03Ha 02R, Gut No–184**total land admeasuring **02Ha 49R, Gut No – 185** total land admeasuring **00Ha 90R, Gut No – 188**total land admeasuring **03Ha 26R, Gut No – 110** total land admeasuring **16Ha 13R** situated Village:-**Karegavhan** Taluka – Beed, District – Beed Maharashtra, from its present owners.

| Sr no | Gut No | Total Area asper 7/12 (Ha. R) | Owner Name | Owners' area as per 7/12 (Ha. R) | Lease Extent (Ha. R) | Easement Extent (Ha. R) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 179 | 03Ha 03R | Malhari Popat Khandare | 00Ha 39R | 00Ha 10R | |
| 2 | | | Laxman Chandrasen Khandre | 00Ha 37R | 00Ha 11R | |
| 3 | | | | | | |
| 4 | 184 | 02Ha 49R | Satish Popat Khandare | 00Ha 28.75R | 00Ha 20R | |
| 5 | | | Malhari Popat Khandare | 00Ha 28.75R | 00Ha 10R | |
| 6 | | | Babuchand Chandrasen Khandare | 00Ha 29R | 00Ha 20R | |
| 7 | | | Laxman Chandrasen Khandare | 00Ha 29R | 00Ha 29R | |
| 8 | | | Chandrasen Bhaguji Khandare | 00Ha 29R | 00Ha 29R | |
| 9 | | | Shrimant Kisan Khandare | 00Ha 59.25R | 00Ha 49R | |
| 10 | | | Ashok Rama Khandare | 00Ha 18R | 00Ha 12R | 00Ha 06R |
| | | | Bapu Rama Khandare | 00Ha 17.25R | 00Ha 17.25R | |
| 11 | | | Hanumant Rama Khandare | 00Ha 18R | 00Ha 18R | |
| 12 | 185 | 00 Ha 90R | Satish Popat Khandare | 00Ha 12R | 00Ha 12R | |
| 13 | | | Malhari Popat Khandare | 00Ha 12R | 00Ha 12R | |
| 14 | | | Kisan Bhaguji Khandare | 00Ha 22R | 00Ha 12R | |
| 15 | | | Chandrasen Bhaguji Khandare | 00Ha 22R | 00Ha 10R | |
| 16 | | | Rama Bhaguji Khandare | 00Ha 22R | 00Ha 10R | |
| 17 | 188 | 03Ha 26R | Laxman Chandrasen Khandare | 00Ha 60R | 00Ha 06R | |
| 18 | | | Hanumant Ramrao Khandare | 00Ha 63R | 00Ha 06R | |
| 22 | 110 | 16Ha 13R | Rama Bhima Tambade | 01Ha 20R | 00Ha 12R | |
| 23 | | | Mahananda Bapu Khandare | 00Ha 95R | 00Ha 07R | |
| 24 | | | Chandrasen Bhaguji Khandare | 00Ha 40R | | 00Ha 05R |
| 25 | | | Popat Bhaguji Khandare | 00Ha 40R | | 00Ha 04R |
| 26 | | | Shrimant Kisan Khandare | 00Ha 40R | | 00Ha 07R |
| 27 | | | Bapu Rama Khandare | 00Ha 13R | | 00Ha 10R |
| | | | **TOTAL** | | **02Ha 60.25R** | **00Ha 32R** |

The Owners have represented that the aforesaid property is free from all encumbrances, charges, liensand the Owners have not entered into any agreements, MOUs, etc. qua the aforesaid property and there areno legal impediments etc. for them to sell and/or lease the same to our client, based on which our client hasagreedto buyand/or lease theaforesaidPropertyand as mentioned in the table.

All persons/companies/entities having any right, title, interest, benefit, claim or demand into, upon oragainst the aforesaid property or any part thereof, by way of inheritance, mortgage, possession, sale,exchange, license, gift, lease, lien, charge, trust, maintenance, bequest, easement, development rights,partnership, joint venture, Decree or Order of any Court of Law or under any other agreement whatsoeverare hereby required to make the same known in writing to the undersigned at the address specified hereinbelow with supporting documentary evidence within 07 (Seven)days of issuance of this Public Notice,failing which the claim and/or objection, if any, shall be considered as waived or abandoned and our clientshallcompletethetransaction ofsellabovereferred towithout referenceto suchclaimordemand.

| Leasedeed Area Boundary Gut No – 179 | |
|---|---|
| EAST | Gut No. 184 |
| WEST | Balance Land of Gut No.179 |
| SOUTH | Gut No.186 |
| NORTH | Gut No.110 |

| Leasedeed Area Boundary Gut No- 184 | |
|---|---|
| EAST | Balance Land of Gut No.184 |
| WEST | Gut No. 179 |
| SOUTH | Gut No. 188 |
| NORTH | Gut No. 110 |

| Leasedeed Area Boundary Gut No – 188 | |
|---|---|
| EAST | Village Boundary of Sonpethwadi |
| WEST | Gut No. 186 |
| SOUTH | Balance Land of Gut No.188 |
| NORTH | Gut No. 185 |

| Leasedeed Area Boundary Gut No – 185 | |
|---|---|
| EAST | Village Boundary of Sonpethwadi |
| WEST | Gut No. 184 |
| SOUTH | Gut No. 188 |
| NORTH | Gut No. 184 |

| Leasedeed Area Boundary Gut No – 110 | |
|---|---|
| EAST | Balance Land of Gut No.110 |
| WEST | Gut No. 180 |
| SOUTH | Gut No.184 |
| NORTH | Balance Land of Gut No.110 |

**ADV. MILIND RAOSAHEB UBALE**
Tal -Beed Dist. Beed
Mo: - 9422744729

Signature

# न.प.निवडणूकीत तरुणांना ५० टक्के प्रतिनिधीत्व देणार-डॉ.क्षीरसागर

## बीडमध्ये नगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जातीतील महिलेसाठी आरक्षित असल्याने आता नव्या महिला नेतृत्वाला संधी मिळणार आहे. ज्यांना पूर्वी संधी मिळाली नाही, त्यांचाही विचार केला जाईल. तसेच, ५० टक्के प्रतिनिधित्व तरुणांना दिले जाईल. गेली ३० वर्ष बीडकरांनी डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे. ही विजयाची परंपरा पुढेही कायम राहणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.



आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात गुरुवारी (दि.१६) बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी नगरसेवक किशोर काळे, गणेश वाघमारे, भास्कर जाधव, नरसिंग नाईकवाडे, शिवाजी जाधव, संजय होळकर, शुभम धूत, अशोक वाघमारे, विकास जोगदंड, प्रकाश कानगावकर, प्रेम चांदणे, रवी जवेरी, राहुल गुरखुदे, बाळासाहेब जाधव, सुभाष सपकाळ, संगीता वाघमारे, शालिनी परदेशी, मुस्तफा भाई, नशीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, महेश गर्जे, अमोल पवळ, साउद भाई, सतीश पवार, नबील जमा, बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव, संभाजी दुधाळ, रवींद्र कदम, जुनेद जहागिरदार, अशोक शेजवळ, बाबू अत्तार, मुजीब एवन, गुड्डू चाऊस, बिलाल, ◀◀ पान २ वर

### कार्यकर्त्यांसाठी पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार : डॉ.सारिकाताई क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वसमावेशक नेतृत्व आहे. त्यांचा शांत स्वभाव आहे, याचा अर्थ आम्ही कमजोर नाहीत. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड शहराचा विकास केला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.योगेश हे राजकारणात पुढे जात आहेत. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन सोबत असलेल्या निष्ठावंत, विकासाभिमुख उमेदवारांना नगरपरिषदेत संधी दिली जाणार आहे. आता महिलांनी नेतृत्व करण्यासाठी सज्ज रहावे. आम्ही निवडणूक लढविणार की नाही, याबाबत निर्णय नाही. परंतु कार्यकर्त्यांसाठी मात्र पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार आहोत. शहरात वॉर्ड ५२ की ५० हे विरोधकांना ठाऊक नाही. त्यांनी शहरात नेमका विकास कुठे केला? हे दाखवून द्यावे, असा टोला विरोधकांना लगावला.

# राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रवेशासाठी गर्दी

## खा.सोनवणेंकडून कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा शब्द

केज । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१६ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केज तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (सा.) येथे संपन्न झाली. यावेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी प्रवेशासाठी अक्षरश: रांग लागली होती. यावेळी आगामी निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभा राहून ताकद देऊ, असा विश्वास खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.




येडेश्वरी साखर कारखाना येथील बैठकीत बनसारोळा येथील माजी जि.प.सदस्य अशोक गायकवाड, माजी सरपंच युवराज काका काकडे, चिंचोलीमाळी येथील लहुजी वस्ताद सेवाभावी संस्था चे अध्यक्ष विठ्ठल झाडे, पिसेगाव येथील नवनाथ नेहरकर, आनेगावचे माजी सरपंच आप्पासाहेब हंडीबाग, श्री. एकनाथ हंडीबाग, विष्णू इंगळे, बिभीषण राऊत, विक्रम हंडीबाग, भैरवनाथ हंडीबाग, श्रीधर हंडीबाग, लक्ष्मण हंडीबाग, श्री. जिवराज हंडीबाग, श्री. नरसिंग हंडीबाग, नवनाथ हंडीबाग, अशोक हंडीबाग, नानासाहेब हंडीबाग, ज्ञानेश्वर खोडसे, श्री. दशरथ हंडीबाग, श्री. तुकाराम इंगळे, युसूफ वडगाव येथील युवा कार्यकर्ते विजय भूमकर, शिवानंद खरबड, शांतिलिंग खरबड तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद चंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस ◀◀ पान २ वर

# माजलगाव शहरातील चांदणी ग्राउंड मधील रस्त्याची दुर्दशा, पाईपलाईनच्या कामामुळे नागरिकांची गैरसोय

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील चांदणी ग्राऊंड परिसरातील रहिवाशांनी नगर परिषदेच्या पाईपलाईन कामाच्या निष्काळजीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेला रस्ता अर्धवट अवस्थेत सोडून एकही कनेक्शन न देता खोदलेला रस्ता परत बुजून टाकल्यामुळे सर्वत्र चिखल आणि खड्डे झाले आहेत, ज्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

सईद भाई यांच्या घरापासून ते ताजुभाई अतार यांच्या घरापर्यंत पाईपलाईन टाकण्याचे काम नगर परिषदेने हाती घेतले होते. मात्र, काम पूर्ण न करताच काम बंद केले आहे ज्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गुडघ्यापर्यंत चिखल झाल्याने रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. याव्यतिरिक्त, पाईपलाईन टाकल्यानंतर



नागरिकांना नळ कनेक्शन देणे आवश्यक असताना, ते न देताच काम अर्धवट सोडण्यात आले आहे. यामुळे शाळकरी मुले, महिला आणि वयोवृद्धांसह सर्वांनाच त्रास होत आहे.

जेव्हा नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली, तेव्हा त्यांना निवडणुकीनंतर काम पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले, जे नागरिकांच्या मते अन्यायकारक आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. अख्या माजलगाव शहरांमध्ये रोडचे काम होत आहे परंतु चांदणी ग्राउंड वस्तीमध्ये काम का होत नाही जर तातडीने या रोडचे काम नाही झाले तर नगरपालिका येथे मुख्याधिकारी साहेबांना अर्ज देऊन सर्व चांदणी ग्राउंडचे रहिवासी उपोषणासाठी नगरपालिकेत बसणार आहे

# चकलंबा जि.प.गटातून परमेश्वर वाघमोडे यांचा निवडणूक लढवण्याचा निर्धार!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलंबा जिल्हा परिषद गटातुन परमेश्वर महाराज वाघमोडे सर यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असुन, सतत जनतेत असणारा नेता अशी त्यांची ओळख आहे, राजकारणा बरोबरच समाजकारण अशी त्यांची विचार धारा असुन, अनेकांना संकट काळी देवदुता प्रमाणी धावुन जाण्याची धमक त्यांच्या रक्तात आहे,



गेवराई तालुक्यातील अत्यंत महत्वाचा समजला जाणारा चकलंबा जिल्हा परिषद गट हा जिल्हा परिषदीचे नांदी ठरला आहे, अहिल्यानगर जिल्हाच्या सरहद्दी लगद असणारा गट आहे, सर्व जाती धर्माचे जनता या गटात राहाते, जिवाला जिव देणारे देव माणसे येथेच अशी अगळी वेगळी रचना असणाऱ्या जि, प, गटात सर्वसामान्य लोंकाचा चेहरा असणारे परमेश्वर वाघमोडे यांनी या गटातुन ठप्प पणे उभा राहण्याची निर्धार केला आहे, या भागात समाजकार्य बरोबरचं पिडीत असाह्याना मदत करणे हा त्यांचा जन्म जात पिंड त्यांनी सतत गोरगरीब यांना रुग्ण सेवासह अनेकांना सढळ होतानी मदत करत या भागातील अनेक जणाचे संसार घडविण्याची काम प्रमाणिक पणे काम केले आहे, त्यांच्या कार्याची पावती म्हणून मिनी मंत्रालय जि, प, मध्ये ते इनटरी करणार आहेत. त्यांना चकलंबा गटातुन भरमसाठ मतदान रुपी आशिर्वाद मिळणार आहेत. यात मात्र शंकाच नाही

समाजासाठी सतत तळमळ अशी ओळख

समाजिक कामात अग्रेसर असणारे परमेश्वर महाराज वाघमोडे सर किर्तन, समाजिक कार्यातून ते सुपरिचित आहे, गरजुवंताना मदत करताना ते कधीच हात अखडता घेत नाहीत, त्यामुळे त्यांना निवडणूक सहज जिंकता येणार आहे,

# ओबीसी महाएल्गार सभेला लाखोंचा जनसागर उसळणार -माऊली शिरसट

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार आणि आरक्षणातील घुसखोरी या अनुषंगाने महत्वपूर्ण मागण्यासाठी आणि न्याय हक्कासाठी पुकारलेल्या या महाआंदोलनाचा भाग म्हणून बीड येथे होणाऱ्या १७ तारखेच्या ओबीसी समाजाच्या न्यायाक्कासाठीच्या सभेला लाखोंचा जनसागर उसळणार असून ३७४ जाती एकवटल्या आहेत.



ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठीच्या महाएल्गार सभेची जय्यत तयारी बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात झाली असून लाखोंचा जनसागर उसळणार आहे. मंत्री छगनराव भुजबळ साहेब, नामदार पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे, जयदत्त क्षीरसागर, आमदार गोपीचंद पडळकर, प्रकाश शेंडगे, शब्बीर अन्सारी, प्राध्यापक लक्ष्मण हाके, ◀◀ पान २ वर

# प्रा.शामसुंदर जाधव यांची काँग्रेसकडे उमेदवारीची मागणी

बीड । प्रतिनिधी

येथील प्रभाग क्रमांक १४ मधून उच्चशिक्षित समाजभिमुख नेतृत्व सर्वसामान्य नागरिकांच्या सदैव अडीअडचणींना धावून जाणारे सर्वांच्या सुखदुःखात सहभागी असणारे व सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांची उकल असणारे युवा तरुण तडफदार नेता म्हणून प्रा.शामसुंदर जाधव यांची ओळख सर्वसामान्य नागरिकात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे झाली या बैठकी मध्ये काँग्रेस पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.पक्षाचे बीड विधानसभा निरीक्षक अन्वर बापू देशमुख व बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्याकडे प्रा. शामसुंदर जाधव यांनी व त्यांच्या समर्थकांनी प्रभाग क्रमांक १४ मधून उमेदवारी मिळण्यासाठी मागणी केली या भागातील नगरसेवक पदासाठी चे प्रबळ दावेदार म्हणून त्यांची चर्चा



सध्या प्रभागात जोरदार असून येणाऱ्या काळात ते सर्वसामान्य माणसांचे काम हे प्रशासकीय पातळीवर करणारे सक्षम नेतृत्व असल्याचेही यावेळी नागरिकांतून बोलले जात आहे. काँग्रेस पक्षाने संधी देऊन प्रा. शामसुंदर जाधव यांनी केलेल्या विद्यार्थी दशेपासून महाराष्ट्र प्रदेश महासचिव, युवक काँग्रेस महासचिव व युवक काँग्रेस उपाध्यक्ष म्हणून ते आजही काम पाहत आहेत. तरी काँग्रेस पक्ष एकनिष्ठतेचे फळ देईल का? असाही प्रश्न यावेळी उपस्थित होत असल्याने होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीत निष्ठावंतांना काँग्रेस पक्ष संधी देईल असा विश्वासही यावेळी पक्षश्रेष्ठीकडे प्रा शामसुंदर जाधव यांनी व्यक्त केला आहे असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात कळवले आहे.

# घाटनांदूर ग्रामपंचायतचा रस्ता खोदून शासनाचे नुकसान करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा -लांडगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील घाटनांदूर येथे ग्रामपंचायतचा रस्ता खोदून शासनाचे नुकसान करणाऱ्या संबंधित गुत्तेदार, सरपंच, ग्रामसेवक, शाखा अभियंता, उपविभागीय अभियंता यांच्यावर गुन्हे दाखल करा या प्रमुख मागणीसाठी रिपब्लिकन बहुजन सेना युवा जिल्हाध्यक्ष दयानंद लांडगे हे मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी पासून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करीत आहेत. त्यांच्या उपोषणाला जनसमर्थन मिळत आहे.



रिपब्लिकन बहुजन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय घाटे यांच्या नेतृत्वाखाली युवा जिल्हाध्यक्ष (बीड) दयानंद लांडगे यांनी या संदर्भात १) जिल्हाधिकारी, बीड, २) मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड, ३) उपविभागीय अधिकारी, तथा उपविभागीय दंडाधिकारी, अंबाजोगाई, ४) उपविभागीय अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग अंबाजोगाई, आणि ५) गटविकास अधिकारी पंचायत समिती, अंबाजोगाई यांना मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर रोजी निवेदन दिले आहे. सदरील निवेदनात युवा जिल्हाध्यक्ष (बीड) दयानंद लांडगे यांनी एका महत्त्वाच्या विषयाकडे शासन व जनतेचे लक्ष वेधून घेतले आहे. मौजे घाटनांदूर येथे सुरू असलेले जलजीवन ◀◀ पान २ वर

# कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

## उंच व तिहेरी उडी स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, आनंदनगर, अंबाजोगाई येथील विद्यार्थ्यांनी नुकत्याच शहरातील क्रीडा संकुल येथे झालेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत स्पृहणीय यश संपादन केले आहे.

उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा व संस्थेचा नावलौकिक वाढविला आहे. नुकत्याच शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर रोजी क्रीडा संकुल, अंबाजोगाई येथे झालेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील विविध मैदानी खेळात शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावून उत्तुंग भरारी घेतली आहे. १७ वर्षे या वयोगटातील शाळेच्या खेळाडूंनी उंच उडी, लांब



उडी, तिहेरी उडी, विविध अंतराच्या धावण्याच्या स्पर्धा तसेच हर्डल्स आदी स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व गाजविले. यात अक्षय विलास मुंडे (उंच उडी -प्रथम क्रमांक), पायल विकास आडे (उंच उडी- प्रथम तर १५०० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक), यशराज दिलीप पवार (३००० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक), अंजली सुदाम वाघमोडे (४०० मीटर हर्डल्स मध्ये प्रथम तर २०० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक), कौशल्या राठोड (तिहेरी उडी-प्रथम क्रमांक), अनिकेत माणिक पवार (४०० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक), हर्षवर्धन मन्मथ काळे (४०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक), अनिल रमेश पवार (३००० मीटर धावणे-तृतीय क्रमांक), सोनाली बालासाहेब राठोड (३००० मीटर धावणे-द्वितीय क्रमांक), ओमकार दिलीप राठोड (१५०० मीटर धावणे-द्वितीय आणि थाळीफेक मध्ये तृतीय क्रमांक), पायल नवनाथ राठोड (४०० मीटर धावणे-तृतीय क्रमांक) तर ४०० मीटर रिले स्पर्धेत अंजली सुदाम वाघमोडे, लक्ष्मी पंढरीनाथ राठोड, पायल नवनाथ राठोड आणि साक्षी राठोड या चौघींच्या टीमने प्रथम क्रमांक मिळवून संघातील एकोपा व उत्तम समन्वय दाखवून दिला. सोबतच १४ वर्षे या वयोगटात अमित गजानन पवार (उंच उडी-द्वितीय तर २०० मीटर धावणे-तृतीय क्रमांक) मिळवून आपल्या क्रीडा कौशल्याची छाप पाडली. संस्थेचे विद्यार्थी यापूर्वी झालेल्या कबड्डी, क्रिकेट व कुस्ती स्पर्धेतूनही झळकले आहेत. १७ वर्षे या वयोगटातील मुलींच्या कबड्डी संघाने तसेच क्रिकेट संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. कुस्ती (ग्रेको रोमन) स्पर्धेत ◀◀ पान २ वर

# पुणे येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या महिन्यात आष्टी मतदारसंघातील अनेक गावांमध्ये आलेल्या प्रचंड पावसामुळे आणि अनपेक्षित पूरपरिस्थितीमुळे शेकडो शेतकऱ्यांचे घर, संसार, पिके आणि जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, जीवन विस्कळीत झाले आणि दिवाळीच्या उंबरठ्यावर हतबलतेचे वातावरण पसरले.अशा परिस्थितीत या पूरग्रस्त बांधवांना दिलासा देण्यासाठी पुणे (चंदननगर) येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांनी सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला आहे.

या दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे दिवाळी गोड करा या भावनेतून किराणा किट, साडी, ड्रेस मटेरियल, ब्लँकेट, आवश्यक वस्तू अशा विविध जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजाच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या या संस्थांच्या माध्यमातून पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळाला. पुण्यातील उद्योजक आणि जैन बांधवांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आपणही समाजाचे काहीतरी देणं लागतो या उदात्त भावनेतून त्यांनी हा उपक्रम राबवला. ◀◀ पान २ वर



# विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

भाजपा शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगरसेवक भाजपाचे लोकप्रिय युवा नेते विनायक रत्नपारखी यांचा वाढदिवस विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला .

भाजप मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.सकाळी मंगलनाथ मंदिर येथे पूजा व महाआरती करून सर्व जनतेसाठी ◀◀ पान २ वर

# उपशिक्षणाधिकारी मारुती जाधव यांनी शिक्षण विभागाचा स्वीकारला पदभार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेत उपशिक्षणाधिकारी, (वर्ग-२ ) पदी मारोती हरिश्चंद्र जाधव यांनी गुरुवार दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी उपशिक्षणाधिकारी (वर्ग- २) पदाचा कार्यभार स्वीकारला. शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, प्रभारी उपशिक्षणाधिरी भगवान सोनवणे, कार्यालय अधीक्षक रंगनाथ राऊत, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी गौतम चोपडे, आदींनी त्यांचे स्वागत केले.





राज्य शासनाने दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी ६३ जणांना उपशिक्षणाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली. सदर पदोन्नतीमध्ये बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दोघा जणांची उपशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शुक्रवार, दि.१७ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# थकबाकीदारानों सावधान! महापालिकेच्या जप्ती पथकांची थेट कारवाई सुरू

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून, थकबाकीदारांवर जप्तीची कठोर कारवाई सुरू आहे. आतापर्यंत शहरातील २७ मालमत्तांची जप्ती करण्यात आली आहे. थकबाकीदारांना नोटिसा बजावण्यात आल्या असून विविध ठिकाणी थेट मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यासाठी करसंकलन विभागाच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कारवाई सुरु आहे.



महापालिकेकडून वारंवार आवाहन करून, नोटीस देऊन देखील मालमत्ता कर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांची मालमत्ता जप्त करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सर्व विभागीय कार्यालयांना दिले आहेत. ही मोहीम पुढील महिनाभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून याकाळात मालमत्ताकर थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांवर कारवाई होणार आहे अशी माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली. या कारवाईसाठी १८ विभागीय कार्यालयांतील सर्व गटप्रमुखांना जबाबदारी देण्यात आली असून, शहरातील निवासी तसेच बिगरनिवासी थकबाकीदारांवर कारवाई सुरू आहे. १ ऑक्टोबर २०२५ पासून विभागीय कार्यालयातील पथकांनी थकबाकीदारांच्या मालमत्तांना भेट देऊन जप्ती प्रक्रिया सुरू केली आहे. दिवसभरात १८ विभागीय कार्यालयांतर्गत १८ पथके वसुली मोहिम राबवत आहेत. आतापर्यंत २७ मालमत्ता सील करण्यात आले असून काही मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन देखील खंडीत करण्यात आले आहे. कारवाईदरम्यान १२५ थकबाकीदारांनी तत्काळ कराचा भरणा करून मालमत्तेवरील कारवाई टाळली आहे.

> थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी महापालिकेकडून मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरु करण्यात आली आहे. या कारवाईत कोणत्याही प्रकारची शिथिलता ठेवली जाणार नाही. मालमत्ता कर थकबाकीदारावरांवर मालमत्ता जप्ती , नळकनेक्शन खंडीत करणे यासारखी कठोर कारवाई सुरु करण्यात आली आहे
>
> –प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त , पिंपरी चिंचवड महापालिका
>
> पिंपरी चिंचवड महापालिकेने कर वसुलीबाबत आता कठोर भूमिका घेतली आहे. थकबाकीदारांना वारंवार सूचना देऊनही कर न भरल्यास महापालिकेस जप्ती कारवाई करणे भाग पडणार आहे. विभागीय कार्यालयांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले असून, थकबाकीदारांनी तात्काळ मालमत्ता कराची थकीत रक्कम भरुन सहकार्य करावे.
>
> – अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# संरक्षणदालाचे बजेट ३ लाख कोटी करणार: राजनाथ सिंग

पुणे। प्रतिनिधी

संरक्षणदलासाठी लागणाऱ्या साहित्य निर्मीतीत आपण आत्मनर्भिर झाल्यानेच ऑपरेशन सिंदूर जिंकू शकलो.त्यामुळे २०२९ पर्यंत संरक्षण दलाचे बजेट दिडलाक कोटी रुपयांवरुन तीन लाख कोंटीपर्यंत वाढविण्यात येणार असल्याची माहिती देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पुण्यात गुरुवारी दिली. तसेच महाराष्ट्राला संरक्षणदलाचे हब बनवू असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा सहावा पदवीप्रदानसोहळा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यानेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकात पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले.जन.धीरज सेठ, विद्यापीठाचे कुलपती डॉ.शां.ब. मुजुमदार, प्र–कुलगुरु डॉ. स्वाती मुजुमदार, संजीवनी मुजुमदार, सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या प्र–कुलगुरू डॉ.विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते.

यावेळी भाषणात संरक्षण मंत्र्यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, ऑपरेशन सिंदूर आपण जिंकलो ते आत्मनिर्भर झाल्याने संरक्षणदालाचे साहित्य आपण आपल्याच देशात बनवत आहोत. त्याचा परिणाम ऑपरेशन सिंदूरच्या वेळी दिसला, त्यामुळे संरक्षणदलाचे बजेच दिड लाख कोटींवरुन २०२८–२९ या आर्थिक वर्षात सुमारे ३ लाख कोटींपर्यंत वाढवले जाईल.तसेच या साहित्याची निर्यात ५० हजार कोटींपर्यंत नेण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला.

# शरद पवारांच्या हस्ते शेतकऱ्यांसाठी दिवाळी सरंजाम वाटप; संदीप बालवडकरांच्या उपक्रमाचे कौतुक

पुणे : राज्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी कोलमडून गेला आहे. अशा संकटाच्या काळात शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी या हेतूने संदीप बालवडकर यांनी आयोजित केलेला दिवाळी सरंजाम वाटप सोहळा कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे मराठवाड्यातून स्थलांतरित झालेल्या नागरिकांसह सर्वसामान्यांची दिवाळी गोड होईल, अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी व्यक्त केल्या.




बालेवाडीतील साई चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) पुणे शहराचे उपाध्यक्ष संदीप धारूजी बालवडकर आणि त्यांच्या पत्नी सुषमा बालवडकर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते हा सोहळा पार पडला. या वेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप, अंकुश काकडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी शरदचंद्र पवार यांनी बालेवाडी परिसराच्या विकासाच्या आठवणींना उजाळा दिला. स्थानिक राजकारणी आणि बालवडकर, चौधरी, मुरकुटे या मंडळींनी जमिनी देण्याची तयारी दाखवली, त्यामुळेच भव्य बालेवाडी स्टेडियम उभारता आले. त्या निमित्ताने बालेवाडीचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आणि अनेक खेळाडू घडले. सहकार्याची भावना ठेवल्यामुळे हे शक्य झाले, असे पवार म्हणाले.आजही आपल्या शेतकरी बांधवांना आधाराची गरज आहे. हीच भावना ठेवून संदीप बालवडकर यांनी शेतकऱ्यांची दिवाळी आनंदी करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्याला सर्वांच्या सहकार्याची साथ लाभत आहे, हे खरोखरच प्रशंसनीय आहे, असे गौरवोद्गार पवार यांनी काढले.कार्यक्रमात संदीप बालवडकर यांनी या परिसराचा कायापालट केवळ पवारसाहेबांमुळे शक्य झाला. त्यांनी त्याचे श्रेय कधीच घेतले नाही, पण नागरिकांना त्याची जाणीव आहे. त्यांच्या हस्ते सरंजाम वितरण सोहळा पार पडणे हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे, असे सांगत पवारांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

# धंगेकरांना गप बसवू नका, चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ तुम्ही उत्तर द्या ; धंगेकरांना पाठिंबा द्यायला काँग्रेसच आली धावून

पुणे । प्रतिनिधी

शिवसेना नेते रवींद्र धंगेकरांना पाठिंबा द्यायला पुण्यात काँग्रेसच धावून आल्याचं दिसत आहे. पुण्यातील काँग्रेसचे शहर अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी निलेश घायवळ प्रकरणात धंगेकरांच्या भूमिकेला थेट पाठिंबा दिला आहे. महायुतीतील लोकांना बोलून धंगेकर अत्यंत चांगले लढत आहेत. काँग्रेसमध्ये असताना त्यांना कोणी काहीही बोललं नाही त्यांना अडवलं नाही. मात्र त्यांना आता दंगा नको म्हणून सांगण्यात येत आहे. त्यामुळे त्यांची काही प्रमाणात महायुतीत गोची होतं असल्याचं दिसून येत आहे. धंगेकर हे पुणेकरांबाबत प्रश्न विचारात आहेत. त्यामुळे चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांनी याल उत्तर द्यायला हावं, अस स्पष्ट मत अरविंद शिंदे यांनी व्यक्त केलं आहे.





पुण्यातील कोथरूड परिसरातील गुंड निलेश घायवळ प्रकरणात रविंद्र धंगेकरांनी मंत्री चंद्रकांत पाटलांना काही प्रश्न विचारले होते, त्याचबरोबर मंत्री पाटील यांच्या जवळचा एक व्यक्ती घायवळच्या संपर्कात असून तो घायवळ आणि चंद्रकांत पाटील यांच्यात चर्चा घडवून आणत असल्याचं सांगितलं आहे. रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषदेत निलेश घायवळ आणि समीर पाटील यांचे चंद्रकांत पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसोबतचे अनेक फोटो दाखवले होते. या फोटोच्या आधारावर रवींद्र धंगेकर यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. निलेश घायवळ ज्या पद्धतीने दादागिरी करतोय, खोटा पासपोर्ट तयार केला गेला. निलेश घायवळ किंवा समीर पाटील असेल ही सर्व लोक चंद्रकांत पाटील यांच्या आसपास असतात. यामुळेच त्यांचे धाडस होत चालले आहे, असं रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं होतं, समीर पाटील ज्यावेळेस पोलीस स्टेशनमध्ये जातो, त्यावेळेस चंद्रकांत पाटील यांच्या जवळचा असल्यामुळे तो पोलिसांवर दबाव टाकतो. धंगेकरांनी समीर पाटील यांच्यावर मोक्का, फसवणूक (चीटिंग) अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्याची माहिती दिली होती.

यावेळी रवींद्र धंगेकरांनी कोथरूडमधील गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांवरून चंद्रकांत पाटलांना आव्हान दिले. कोथरूडमध्ये ज्या पद्धतीने गुन्हेगारी चालते, रोज मुडदे पडतात, रिव्हॉल्व्हर निघतायेत. तुम्ही तिथले लोकप्रतिनिधी आहात. त्यामुळे आम्ही तुम्हाला विचारतोय, तुम्ही म्हणा एकदा की आम्ही त्यांचा खात्मा करू. गौतमी पाटीलवर क्शन घेणाऱ्या चंद्रकांत पाटलांनी या गुंडांना उचला असे का म्हणत नाही? चंद्रकांत पाटील तुम्ही त्यांना घाबरत आहात का?, असा सवाल धंगेकर यांनी केला.

# भुशी गावाचा ११० वर्षांचा संघर्ष संपला! आमदार शेळके यांच्या पाठपुराव्यानंतर ग्रामस्थांना मिळाले प्रॉपर्टी कार्ड्स

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील भुशी गावाचा तब्बल ११० वर्षांपासून रखडलेला राहत्या घरांच्या मालकी हक्काचा प्रश्न अखेर सुटला आहे. यासाठी आमदार सुनील शेळके



यांनी पाठपुरवठा केला होता. बुधवारी (१५ ऑक्टोबर) रोजी शासनाचे अधिकारी, स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत या प्रॉपर्टी कार्डचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला मावळचे प्रांत अधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, उपअधीक्षक भूमी अभिलेख पल्लवी पिगळे तसेच लोणावळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी साबळे हे मान्यवर उपस्थित होते.

भुशी गावातील ग्रामस्थांचा हा संघर्ष १९१३ साली सुरू झाला. टाटा धरण प्रकल्पासाठी गाव विस्थापित झाल्यानंतर ग्रामस्थांचे कायदेशीर पुनर्वसन झाले नव्हते. परिणामी, गावकऱ्यांकडे त्यांच्या राहत्या घरांच्या मालकी हक्काचा कोणताही सरकारी पुरावा नव्हता. अनेक पिढ्यांनी शासनदरबारी धावपळ केली, अर्ज सादर केले, परंतु प्रश्न कायम प्रलंबित राहिला.

१०७६ पासून पांडुरंग मराठे, सोपान मराठे, भागूजी न्हालवे यांसारख्या ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केला. तरीही त्यांना न्याय मिळाला नाही. शेवटी, आमदार सुनील शेळके यांनी हा मुद्दा शासनाच्या उच्चस्तरीय बैठकीत मांडला आणि संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून प्रकरण मार्गी लावले. प्रत्यक्ष प्रॉपर्टी कार्डे ग्रामस्थांना मिळाल्याने त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. अनेकांनी आमदार शेळके यांनी आमचा न्यायाचा लढा पूर्ण करून दिला असे म्हणत कृतज्ञता व्यक्त केली. हा निर्णय ग्रामस्थांसाठी नव्या आयुष्याची नवी सुरुवात ठरत आहे. भुशी गावाचा ११० वर्षांचा प्रॉपर्टी हक्काचा प्रश्न सुटल्याने मावळ तालुक्यात ऐतिहासिक पाऊल पडले आहे. शासनाच्या अधिकारी वर्गाच्या सहकार्याने आणि आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वामुळे शेकडो कुटुंबांना त्यांच्या हक्काची जमीन मिळाली आहे. हा दिवस भुशी ग्रामस्थांच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल.

# प्रदूषणमुक्त प्रवासासाठी पुण्यात हायड्रोजन बस दाखल; लवकरच घेणार चाचणी

पुणे । प्रतिनिधी


पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी) आता पर्यावरणपूरक प्रवासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) यांच्या सहकार्याने इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसीएल) आणि टाटा यांनी संयुक्तपणे विकसित केलेली हायड्रोजन बस पुण्यात दाखल झाली आहे.




या बसची चाचणी पुढील आठवडाभर इन्स्टिट्यूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च (आयडीटीआर) संस्थेतर्फे शहरातील विविध मार्गांवर घेण्यात येणार आहे. चाचणी यशस्वी झाल्यास याबाबत पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती पीएमपी प्रशासनाने दिली.पुण्यातील वाढत्या प्रदूषणाच्या समस्येला तोंड देण्यासाठी पीएमपी प्रशासन पर्यायी आणि पर्यावरणपूरक वाहनांवर लक्ष केंद्रित करत आहे. हायड्रोजन बस ही पूर्णपणे प्रदूषणमुक्त असून, ती चालवताना कार्बन उत्सर्जन होत नाही. यामुळे शहरातील हवेच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. बुधवारी दाखल झालेल्या या हायड्रोजन बसच्या चाचणीला लवकरच सुरुवात होणार असून, यशस्वी चाचणीनंतर पुण्याच्या रस्त्यांवर या बस नियमित धावण्याची शक्यता आहे.

# पेटशॉपमध्ये आंघोळ घातल्यानंतर श्वानाचा मृत्यू, शॉप चालकासह तिघांविरुद्ध गुन्हा

पुणे : कुत्र्याच्या मृत्यूप्रकरणी कल्याणीनगर भागातील एका पेटशॉपच्या मालकासह तिघांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वेटीक पेटशॉपचे मालक, कर्मचारी इस्माइल शेख, राज ऊर्फ प्रदीप दास यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका तरुणीने येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार २८ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी वडगाव शेरी भागातील एका उच्चभ्रू सोसायटीत राहायला आहे. तिने डॅश नावाचा कुत्रा पाळला होता. कल्याणीनगर भागात वेटीक पेटशॉप आहे. या पेटशॉपमध्ये कुत्र्यांची देखभाल, निगराणी राखली जाते. तरुणीने २८ सप्टेंबर रोजी आपल्या कुत्र्याला पेटशॉपमध्ये पाठविले होते. तरुणीच्या कुत्र्याला आंघोळ घातल्यानंतर त्याला उलटी झाली. त्यानंतर त्याचा मृत्यू झाला, असे तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

कुत्र्याला आंघोळ योग्य पद्धतीने घातली नाही. पेटशॉपमधील कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे दुर्घटना घडल्याचे तरुणीने फिर्यादीत नमूद केले आहे. तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम कलम ११, तसेच अन्य कलमांन्वये पेटशॉपच्या मालकासह कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील तपास करत आहेत.

# पूजा खेडकरच्या वडिलांना मोठा दिलासा; ट्रक क्लिनरच्या अपहरण प्रकरणात हायकोर्टाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

पुणे । प्रतिनिधी

नवी मुंबईत ट्रक क्लिनरच्या अपहरण प्रकरणात फरार असलेले निवृत्त आयएएस अधिकारी दिलीप खेडकर यांना अखेर मुंबई उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. रस्ते अपघातानंतर झालेल्या या वादग्रस्त घटनेत खेडकर आणि त्यांच्या अंगरक्षकावर ट्रक क्लिनरला मारहाण करून जबरदस्तीने गाडीत बसवून नेल्याचा गंभीर आरोप आहे.

१२ सप्टेंबर रोजी नवी मुंबईतील मुलुंड–आयरोली लिंक रोडवर २२ वर्षीय प्रल्हाद कुमार या ट्रक क्लिनरच्या काँक्रीट मिक्सर ट्रकने चुकून दिलीप खेडकर यांच्या लँड क्रूझर गाडीला धक्का दिला. या घटनेनंतर, संतापाच्या भरात दिलीप खेडकर आणि त्यांच्या अंगरक्षकाने प्रल्हाद कुमारला मारहाण करत गाडीत बसवले आणि पोलिस ठाण्यात नेतो असे सांगत त्याचे अपहरण केल्याचा आरोप नोंदवण्यात आला. १४ सप्टेंबरला, पोलिसांनी खेडकर यांच्या घरातून प्रल्हाद कुमारला सुरक्षित सोडवले, तेव्हापासून खेडकर फरार होते. त्यांचा ६ ऑक्टोबरला अटकपूर्व जामीन फेटाळला गेला होता, मात्र १६ ऑक्टोबर रोजी उच्च





न्यायालयाने जामीन मंजूर केला.

दिलीप खेडकर यांची पत्नी मनोरमा खेडकर यांच्यावरही पोलीस तपासात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी चौकशीसाठी नोटीस बजावूनही सहकार्य केले नाही. सायंकाळी ६ वाजल्यानंतर चौकशीसाठी हजर झाल्या, ज्यामुळे कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप पोलिसांनी न्यायालयात केला. याच प्रकरणात मनोरमा खेडकर यांना देखील १५ दिवसांपूर्वी स्थानिक न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला होता. मात्र, याबाबतची माहिती पोलिसांकडे नव्हती, अशी कबुलीही पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, मनोरमा खेडकर यांचा वादग्रस्त इतिहासही लक्षवेधी ठरतो. पुण्यातील चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात बनावट कागदपत्रांच्या आधारे मालमत्तेवर कब्जा मिळवण्याचे गुन्हे दाखल आहेत. तसेच, अनेक वेळा त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांशी उर्मट वर्तन केल्याच्या तक्रारीही नोंदवल्या गेल्या आहेत. परिसरात त्यांच्या वर्तनामुळे दहशत निर्माण झाल्याचे आरोप शेजाऱ्यांनी केले होते. या साऱ्या घटनांमुळे वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि त्यांचे कुटुंब पुन्हा चर्चेत आले आहेत. पूजा खेडकर यांच्यावर आधीच नियमभंग, निलंबन व नियुक्ती प्रक्रियेत फसवणुकीचे आरोप आहेत. आता त्यांच्या पालकांवरही गंभीर गुन्हे दाखल होत असल्याने, खेडकर कुटुंब पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

# दिवाळीसाठी पिंपरी चिंचवड अग्निशमन दलाची ‘सुरक्षित दिवाळी’ मोहीम

## फटाक्यांमुळे होणाऱ्या आगीच्या घटनांपासून बचावासाठी जनजागृती आणि आपत्कालीन तयारी पूर्ण

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळीचा आनंद साजरा करताना, गेल्या काही वर्षांत शहरात दिवाळीच्या कालावधीत घडणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत ‘सुरक्षित दिवाळी’ मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत आपत्कालीन परिस्थितीसाठी पूर्वतयारी तसेच विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी सुरक्षिततेच्या सूचनांचे काटेकोर पालन करून आनंददायी व सुरक्षित दिवाळी साजरी करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




दिवाळीच्या काळात नागरिकांनी आपल्या परिसरातील पार्किंग, रस्ते, वसाहती आणि बाजारपेठांमध्ये निष्काळजीपणे फटाके फोडणे टाळावे. प्रत्येकाने स्वत:ची, कुटुंबाची आणि समाजाची सुरक्षा राखावी. आग लागल्यास त्वरित १०१ या अग्निशमन नियंत्रण कक्षाच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

अग्निशमन दल सज्ज

दिवाळी काळात शहरात आगीच्या घटनांची शक्यता लक्षात घेऊन अग्निशमन विभाग सज्ज झाला आहे. महापालिकेच्या सर्व १० अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याचे, तसेच सर्व कर्मचारी आणि अधिकारी ‘रजा रद्द’ करून २४ तास कार्यरत राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुख्य नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत राहणार असून, १०१ क्रमांकावर संपर्क केल्यास तातडीने प्रतिसाद देण्यात येत आहे. फटाक्यांच्या स्टॉल परिसरात अग्निशमन वाहनांची गस्त ठेवण्यात आली आहे. फटाके विक्रेत्यांना आणि नागरिकांना लेखी व मौखिक सूचना देण्यात आल्या आहेत.